म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८०५

# शब्दवेध



REFBK-0022914

ब्रह्मानंद देशपांडे

निबंध [महानुभाव वाङ्मय]
संदर्भ


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

निबंध
२८०५
२२९१४
४।७।८०
संदर्भ शाखा

# शब्दवेध

ब्रह्मानंद देशपांडे

□ □

REFBK-0022914

धारा प्रकाशन
बन्सीलाल नगर,
औरंगाबाद - ४३१००१.

धारा प्रकाशन : पंधरा

शब्दवेध : ब्रह्मानंद देशपांडे

प्रथमावृत्ती : जून ७९

सर्व हक्क : अंबरीष देशपांडे

प्रकाशिका : सौ. आशा बाबा भांड.
धारा प्रकाशन, बन्सीलाल नगर, औरंगाबाद.

मुद्रक : वसंत भाले, पब्लिसिटी प्रिन्टर्स, औरंगाबाद.

किंमत : सहा रुपये

ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८५
२२०७४
निबंध
शाखा (स्थळ

अंभोजिनीवननिवासविहारमेव
हंसस्य हन्ति नितरां कुपितो विधाता
न त्वस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धा
वैदग्ध्य कीर्त्तिमपहर्तुमसौ समर्थः।।

— सुभाषितरत्नभांडागारे.

ब्रह्मदेव जरी अतिशय क्रुद्ध झाला तरी तो हंसाचे मानसरोवरातले विहार बंद करु शकेल. दुध आणि पाणी वेगळे करण्याची हंसाची विलक्षण बुद्धीमत्ता तो कशी हिरावून घेणार?

(लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या बंदीवासात असतांना लिहीलेल्या गीतारहस्याच्या हस्तलिखिताच्या पहिल्याच पानावर हे सुभाषित उद्धृत केले आहे.)

कृतज्ञता ....

परमपूजनीय महंत श्रीं. नागराज बाबा

मा. श्री. योगिराज शास्त्री

मा. श्री. देविसिंहजी चौहान

प्राचार्य नरहर कुरुंदकर

प्रा. तु. शं. कुलकर्णी

बाबा भांड

पब्लिसिटी प्रिंटर्स

# प्रस्तावना

मराठी भाषेच्या जडण–घडणीच्या, विकासाच्या दृष्टीने यादव काळाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. श्रीज्ञानेश्वरी लीळाचरित्र, अमृतानुभाव, गोविंदप्रभू, चरित्र, दृष्टान्तपाठ, रुक्मिणीस्वयंवर इत्यादि ग्रंथराजांच्या प्रादुर्भावाचा, मराठी भाषेच्या प्रौढ आणि सरस वळणाचा हा काळ. ह्या ग्रंथांतील शद्वसंपत्ती हे मराठी भाषेचे अमोल असे भूषण आहे. पण दुर्दैवाने ह्या शद्वसंपत्तीचा व्हावा तसा अभ्यास झाला नाही. आचार्य पदवीपर्यंत [Ph. D.] शिक्षण देणारी पांच विद्यापीठे आणि भाषाशास्त्राचा स्वतंत्र विभाग असलेली डेक्कन कॉलेज-सारखी संस्था असूनही मराठीचे ऐतिहासिक व्याकरण अजून सिद्ध होत नाही ही आदरणीय देवीसिंहजी चौहानांसारख्या ज्ञानतपस्वींची खंत बोलकी आहे.

म्हणून उण्यापुऱ्या तीसबत्तीस शद्वांच्या अभ्यासाचा हा प्रयत्न. मराठीभाषेचे अत्यल्प आणि भाषाशास्त्राचे शून्य ज्ञान असताही केलेला. तो कसा उतरला आहे हे विद्वज्जनच ठरवितील. यातील त्रुटी त्यांनी दाखविल्यास कृतज्ञ राहीन.

अकार चरणयुगुल । ऊकार उदर विशाल
मकारु महामंडल । मस्तकाकारे ॥

हे तिन्ही एकवटले । तेथ शद्वब्रह्म कवळले
ते मिया श्रीगुरुकृपा नमिले । आदिबीज ॥

हा सर्व प्रयत्न त्या आदिबीजाला अर्पण.

– ब्रह्मानंद देशपांडे

# अनुक्रम


**अ**

अवगळा
आधाचा
आळंद
आंगारिका
आंबुखा
उभेमार्गी

**क**

कटक
कातळे
कापडवी
कोळपुरुष
कोदे कांडविणे
घागरा

**च**

चांगदेव
चेंदा
चाटे
जाळी

**त**

तारकवडा
दामनी
नालाकोला
निर्वडि

**प**

पविते
भडकळ
मदळसा
मोगरसूल
म्हातारदाम

**र**

रामहाटु
राजमठ
राळेमवणे
वाखारी
वसइ
वोहणी

**स**

सिमोरी
सूड


**संकेत** लीच ए — लीळाचरित्र एकांक.
लीच पू — लीळाचरित्र पूर्वार्ध.
लीच उ — लीळाचरित्र उत्तरार्ध.
गोप्र च — गोविंदप्रभूचरित्र.

## १. अवगळा

स्वामींचे वास्तव्य नांदेड–राहेर भागात असताना 'गोपाळ चोंढीए लपविणे' ही लीळा घडली आहे. स्वामी एका विहिरीच्या काठावर बसले असता तेथे गावातील गोपाळ आले. ते विहीरीत उतरताच अदृश्य झाले. गावातील लोक त्यांना शोधावयास आले असता स्वामींनी सांगितले 'एथ असति: आपुलालेयांचि नांवे घेऊनि बोलावा.' त्या प्रमाणे एकेकाचे नांवे घेऊन बोलावताच गोपाळ आले. स्वामींनी आपल्या एकांक परिभ्रमण काळातील ही लीळा कथन केल्यावर महदाइसांनी त्यांना साहजिकच प्रश्न केला 'हा : जी : ते के होते' यावर स्वामींनी 'अवगळा' एकी धरिले होते.' असे उत्तर दिले. येथे अवगळा हा शब्द आला आहे.

डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यानी 'अवगळा एकीं धरिले होते' ह्याचा अर्थ विहीरीच्या तळाच्या गाळात रुतून बसले होते' असा केला आहे. तो अर्थातच अनुमानित आहे. महानुभाव मासिकाच्या जुलै १९७८ च्या अंकात डॉ. मधुकर वाकोडे ह्यानी 'अवगळा' ह्या शब्दावर मोठे भाष्य केले आहे. त्यांच्या प्रदीर्घ विवेचनातील लोकसाहित्य, लोकतत्व, लोकलकब (=?) इत्यादींची अनावश्यक भलावण, 'गुरे चारणारी लहान मुले म्हणजे गोपाळ आणि मोठी माणसे म्हणजे गोवारी' ह्या सारखी आधारहीन विधाने, प्रतिपक्षावर टीका करतांना सोडलेले अवधान इत्यादि बराच फापटपसारा उणा करावा लागतो. असो. त्यांच्या विवेचनाचे मूळ सूत्र 'धरिले' ह्या शब्दापासून सुरु झालेले दिसते. खेडयातून भूताने वा हडळ–चूडेलांनी धरणे हा शब्दप्रयोग केला जातो हे मान्य. (डॉ. मधुकर वाकोडे ह्याना अभिप्रेत असलेल्या आसरा वा अप्सरा माणसे 'धरतात' की काय हे आम्हास ठाऊक नाही) एकदा 'धरणे' म्हणजे भूतपिशाच्चाने झपाटणे हा अर्थ पक्का करुन मग डॉ. मधुकर वाकोडे 'अवगळा' म्हणजे अप्सरा (कारण स्वामी विहीरीच्या काठी होते आणि गोपाळ 'चोंडीए'त लपविले होते) हे सिद्ध करण्याच्या उद्योगाला लागलेले दिसतात. असो. ह्या साठी त्यांनी

तरी आंगे कर्मे ढिला : जो मने विकल्पे भरला

अडवीचा अवगळला : कुहा जैसा ॥१३.६७८॥

या ओवीचा अर्थ 'आडरानातील' आड (अडवीचा कुहा) अमंगळ कां तर तो अप्सरांनी व्यापला असतो म्हणून असा अर्थ काढला आहे. (जणू काही नित्य उपयोगात असणाऱ्या विहीरी बारवा तळयात अप्सरा नसतातच. काय हे लोकतत्वाचे ज्ञान ! 'प्रस्तुत लेखक लहानपणी आईसाठी सोवळचाचे पाणी 'अप्सरांच्या' विहीरीवरूनच आणी हे ह्याठिकाणी स्मरते ) महानुभाव मासिकाच्या सप्टेंबर १९७८च्या अंकात डॉ. वि. भि. कोलते ह्यानी डॉ. मधुकर वाकोडे ह्यांच्या 'अवगळा म्हणजे अप्सरानी व्यापलेला' ह्या अर्थाचे साधार खंडन करून 'अवगळा म्हणजे निखळलेला, खचलेला पडका आणि म्हणूनच त्याज्य' हे साधार सिद्ध केले आहे. 'अवगळा' हा शब्द अपगलित ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे हे त्यांचे मत सहज मान्य होण्यासारखे आहे. असो.

आता अवगळा म्हणजे अप्सरा हा अर्थ सिद्ध करण्यासाठी डॉ. मधुकर वाकोडे हे कानडी 'गाळि' ह्या शब्दाकडे वळले आहेत. आसुरी वा दुष्ट शक्तींना कानडीत 'गाळि' म्हणतात हे किट्टेलने नोंदविले आहे. 'ह्या गाळि शब्दाला 'अव' हा उपसर्ग लागून तर हा 'अवगळा' शब्द बनला नसावा अशी शंका डॉ. मधुकर वाकोडे व्यक्त करतात. पण आधीच 'गाळि' दुष्ट शक्ती त्याला पुन्हा अव हा उपसर्ग लावल्याने पुनरूक्तीचा (Tautology) दोष पदरी येणार नाही काय ? देवतादर्शक संज्ञाना उपसर्ग लागतात काय ? गाळि हे काळी; काली ह्या देवतानामाचे कानडी रूप दिसते. उदा. कार गार हा प्रत्यय पहा. कानडीचे 'ळ' कारबहुत्त्व आणि 'क' चा 'ग' करण्याची धाटणी ही दोन्ही वैशिष्ठये इथे दिसतात. 'गाळि' जर 'काली' असेल तर ती अप्सरा होऊ शकेल काय ? इत्यादि अनेक शंका संभवतात. तस्मात् डॉ. मधुकर वाकोडे हयाचा अर्थ ग्राहय वाटत नाही.

अवगळा ह्या शब्दावरील डॉ. मधुकर वाकोडे ह्यांचे चुकीचे विवेचन खोडून काढतांना डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी हा लीळेच्या 'आदि' (शीर्षक, मथळा ) कडे लक्ष वेधले आहे. ते लिहीतात, 'या लीळेंची आदि 'गोपाळ चोंढीए लपविणे' अशी आहे. एकाकी असतांना श्रीचक्रधर स्वामींनी ज्या लीळा केल्या त्यातील ही एक **लीळा** आहे. स्वामींनी केलेली लीळा लक्षात घेऊनच तिची आदि दिलेली आहे. अर्थात् गोपाळ चोंढीए लपवण्याची लीळा स्वामींनी केली आहे. हे लपविण्याचे कर्तृत्व त्यांचे आहे. एखाद्या देवतेचे नव्हे. गोपाळांना देवतेने लपविले आणि स्वामींनी त्यांची

मुक्तता केली असा या लीळेचा आशय असता तर तो सूचित करणारी वाक्ये वा त्याला अनुसरून लीळेची आदि असती हे लक्षात घेतले पाहिजे.'

वास्तविक अवगळा ह्या शब्दाला महानुभाव तत्त्वज्ञानात विशिष्ठ असा पारिभाषिक अर्थ आहे. 'महानुभाव तत्त्वज्ञान' ह्या ग्रंथातील पुढील उतारा अर्थनिर्णायक ठरेल अशी आशा वाटते.

> 'जीवाला स्थूळ प्रपंचात घालून त्याजकडून ईश्वर विषयक कर्मे घडून यावी हीच तर परमेश्वराची योजना असते. त्याचसाठी सृष्टीची रचना केली जाते ..............................
> सूक्ष्म प्रपंच तयार झाल्यावर स्थूळाची रचना होऊन जीव चतुर्विध कर्मफळात घातला जायला कालावधी लागतो. तो पर्यन्त जीव माया स्वरुपाच्या आधारे असतात. . ...............मूळ सृष्टीच्या रचनाकाळी मात्र सूक्ष्म प्रपंच रचनेनंतर जीवाला **अवगळा** नामक विभागात ठेवून तेथून ज्ञानदानासाठी कर्मभूमीत नेले जाते ........ ......... . ...'[1]

अर्थात् महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे 'अवगळा' हा मायेचा विभाग होय. 'युग पुरे तव अवगळा असे' हे विचारमालिकेचे सूत्र (क्र. १७०) त्याचा अप्सरेशी वा इतर दुष्ट शक्तीशी संबंध नाही असे स्पष्टच सांगते. "एका कर्मफळाच्या आगगाडीतून उतरवला गेल्यानंतर जीव पुढील कर्मफळाच्या आगगाडीत चढवला जाईपर्यंत थांबून राहण्यासाठी अव्यक्त मायेने आपल्या स्वरूपाधारे केलेली ती दैवराहाटीच्या जीवाची 'वेटिंग रूम' आहे. हा अवगळा विभाग सुखदुःखरहित आहे.

तस्मात् 'अवगळा' ही महानुभाव तत्त्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञा आहे. तिचा अप्सरा वा आजकाल ज्यांचं विनाकारण स्तोम माजविले जाते आहे अशा 'लोकतत्त्वाशी' संबंध नाही. (संदर्भ लीए ३२)

■ ■

## २. आधाचा

स्वामींचे वास्तव्य विंध्यप्रदेशात गोंडवाड्यात होते. स्वामी गोंडामध्य चांगलेच रमले. हे गोंड स्वामींचे आदर आतिथ्य आपल्या वन्य पद्धतींनी करीत. 'वेळवाचे कांडोरे' चिरून त्यात तांदूळ घालीत. हे कांडोरे बंद करून आगीमध्ये घालीत. अशा रीतीने शिजलेला भात निवण्यासाठी ठेवल्यानंतर 'एकी दोणा **आधाचा** मधु घालिती' असे वाक्य आले आहे. 'आधाचा'

या शद्वाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'अर्धा कच्चा' असा दिला आहे, पण त्याविषयी ते स्वतःच साशंक आहेत. कुठल्याही प्रकारचा मध अर्धा कच्चा असणे संभवत नाही हे सांगणे नकोच. डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी श्री. ह. ना. नेने ह्यांनी दिलेला 'लहान मधमाशांनी साठविलेला मध' असा 'आधाचा' या शद्वाचा केलेला अर्थही उद्धृत केला आहे. पण श्री. ह. ना. नेने ह्यांनी हा अर्थ कशाच्या आधारावर केलेला आहे ? लहान आणि मोठ्या मधमशांनी साठविलेल्या मधात काय भेद असेल ते एक श्री. नेनेच जाणीत. तेव्हा 'आधाचा' ह्या शद्वाचा अर्थ इतरत्र शोधला पाहिजे.

ही लीळा गोंडांनी केलेल्या आदरसत्कारासंबंधी आहे, या लीळेचा प्रसंग स्वामी वर्णितात तोच मुळी भुतानंदांच्या लेकीने 'चींचुकरटात' – चिंचेच्या कुहाचा लेप देऊन केलेल्या भांड्यात – तांदुळ रांधल्याच्या संदर्भावरून. गोंडांच्या पालात सामग्री ती काय असणार ? म्हणून 'वेळूच्या कांडोरात' तांदुळ शिजविला जातो. मध 'आधात' म्हणजे भोपळ्याच्या तुंब्यात ठेवलेला असतो. तेव्हा आधा म्हणजे भोपळ्याचा तुंबा. ह्यालाच तार लावून तंतुवाद्य तयार केले म्हणजे त्यास 'आधाटी' म्हणतात. नरींद्राच्या रूक्मिणीसैंवरातील

> हातीं हरिचंदनाची **आधाटी** : माणिकाची उथाळी कोंही सेवटी :
> तुंबेयातळीं नाभि मुधटी : वोतिवं चंद्रकळेची । ॥१७३॥

ही ओवी पहावी. तेव्हा **आधा** म्हणजे भोपळयाचा तुंबा हा अर्थ निष्पन्न होतो. आणि गोंडांनी तुंब्यात मध साठवून ठेवण्याच्या संदर्भात तो चपखल बसतोही. मधासारखे पदार्थ 'आधास' भोपळयाच्या तुंब्यात साठवून ठेवीत असत हे दुसऱ्याही एका लीळेवरून स्पष्ट होते. ही लीळा उत्तरार्धातील आहे. आऊसांनी स्वामींची 'आंगी' शिवणाऱ्या शिंप्यास भोजन घातल्यावरून तिला शिक्षा झाल्याविषयीची ती लीळा आहे. शिंप्याला शिवणावळ म्हणून एक दाम दिल्यावरही आऊसेने त्यास वाढण दिले याविषयी गाऱ्हाणे सांगून झाल्यावर नागदेवाचार्य पुढे म्हणतात

> 'आणि ऐसि जी आऊः कालि मिया गोसावियांचेया उपाहानौ लागौनि एका रूकेयाचे लोणी आणविले: ते **आढाचे** लोणि काढिले : **आढाभरि** यां आपुला खांडूवा धुवविलो'
>
> (लीचऊ. १२३)

येथेही लोण्यासारखा कुत्र्या-मांजरा - मुंग्यापासून रक्षण करण्याचा पदार्थ 'आढात' ठेविलेला दिसतो. 'आढाभरि या आपुला खांडुवा धुवविला' या

शब्दप्रयोगाने तर हे पात्रच आहे असे स्पष्ट दिसते. मधु लोणी इत्यादी वस्तु तुंब्यात ठेवणे संयुक्तिकच दिसते. (संदर्भ. लीए २३)

## ३. आळंद

हा शब्द गोविंदप्रभूचरीत्रात आणि लीळाचरित्रातही येतो. ऋद्धिपुरात विठ्ठल ज्योतिषी नामक ब्राह्मण होता. त्याची पत्नी स्वतः दुधाशी जेवे पण सुनांना ताक वाढत असे. रात्री त्या सुना जेवीत बसल्या असता श्रीगोविंदप्रभु तेथे गेले. तिये 'आळंदा दुध नीववितें असेतिः तें दुध सुनासि गाडुगेवरि वाढतिः.' या ठिकाणी आळंद हा शब्द आला आहे. डॉ. वि.भि. कोलते ह्यानी ह्या शब्दाचा अर्थ 'दुधाची खोबरी,' 'तावणी' असा दिला आहे. तो संदर्भाशी जुळणारा आहे. पण 'आळंद' हाच शब्द लीळाचरित्रात आणि गोविंदप्रभूचरित्रात इतरत्रही आला आहे.

लीळाचरित्रात हा शब्द श्री गोविंदप्रभू आणि श्रीचक्रधरस्वामी हयांच्या भेटीच्या संदर्भात येतो. (लीळाचरित्र पूर्वार्ध भाग १, लीळा ३४). स्वामी ऋद्धिपुरेली गेल्यानंतर स्वामी त्याना कसे दिसले तर 'श्रीप्रभू आळंदीया माजी खेळ करितातीः.' डॉ. शं. गो. तुळपुळे हयानी 'आळंदी म्हणजे जमीनीत पुरलेला मातीचा रांजण. असे दोन रांजण रितपुरात पुरलेले होते असे स्थानपोथीतील उल्लेखावरून वाटते.' अशी टीप हया लीळेवर दिली आहे. डॉ. वि. भि. कोलते हयानीही स्थानपोथीच्या दुसऱ्या आवृत्तीत आळंद शब्दाचा अर्थ 'रांजण, मोठया तोंडाचे मातीचे भांडे' असा दिला आहे. अर्थात त्यांनीच दिलेला पहिला अर्थ चुकीचा ठरतो. अर्थात आळंद हया शब्दाचे 'दुधाची तावणी अथवा खोबरी. जमिनीत पुरलेला रांजण,' हे अर्थ योग्य वाटत नाहीत. डॉ. शं. गो. तुळपुळे हयांच्या निर्देशानुसार स्थानपोथी पहावी तर 'जमिनीत पुरलेला रांजण' हा अर्थ अगदीच उडून जातो.

लीळाचरित्रातील पूर्वार्ध लीला ३४ वरून श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधर स्वामी हयांची भेट ऋद्धिपुरातील 'माल्हणदेवी' नामक स्थानापाशी झाली होती हे आपणास कळते. स्थानपोथीतील माल्हणदेवी संबध्द स्थानांचे वर्णन असे आहे.

> 'नगराचे दारवठे च्यारिः पसिमीली दारवठाहूनि माल्हणदेवीचा मार्गु ..................... ओणया पसीमे **अळंदया :** उत्तरदक्षीण दोन्हीः दोहीमध्ये दोही देवा भेटी
>
> (स्थानपोथी पृष्ट ७६ )

या ठिकानी 'आळंदी' म्हणजे रांजण घेतला तर रांजण उत्तरदक्षिण कसे असतील. याही पेक्षा स्पष्ट उल्लेख स्थानपोथीत ' पूर्वपसीम अळंदयापासौनि आली गेली गोदरी' या स्थाननिर्देशात आला आहे. रांजण वा मातीच्या भांडयांचा उल्लेख 'पूर्वपसीम' वा उत्तरदक्षिण, असा कसा येईल ? शिवाय पुरलेल्या रांजणांच्या ओळीचा उल्लेख श्रीगोविंदप्रभूचरित्रात आणि स्थानपोथीत ' रांजणवडी' असा वेगळा आहेच. तस्मात् आळंद म्हणजे भूमीत गाडलेला रांजण नव्हे हे निष्पन्न होते.

तस्मात आळंद हा वास्तुविशेष आहे. म्हणूनच त्याचा उपयोग 'पूर्वपसीम' अथवा 'उत्तरदक्षिण' अशा विशेषणांसह झाला आहे. अलिंद म्हणजे ओसरी (corridor) ह्या शब्दापासून हा तद्भव शब्द आलेला दिसतो. दूध निवण्यासाठी ओसरीत हवेला ठेवणे किंवा आळंद 'पूर्वपसिम वा 'दक्षिणउत्तर' असणे ह्याचा आता उलगडा होतो. अर्थात आळंद म्हणजे ओसरी 'बरामदा' वा 'corridor' हाच अर्थ योग्य ठरतो. आळंद म्हणजे मातीचे भांडे हा अर्थ दासोपंतांनी[2] आणि यशस्तिलकचंपूनेही दिला आहे. पण वरील संदर्भात तो ग्राह्य वाटत नाही.[3]

(संदर्भ. ली. पू. ३२. गोप्र. ३८.)

■ ■

## ४. अंगारिका

स्वामींचे वास्तव्य पाटोदा येथे असतांना त्यांच्या उपहाराची व्यवस्था महदाइसांनी केली. तिने आणलेल्या वस्तु बाइसांच्या हाती दिल्या आणि सांगितले

'बाइः भक्तजनासहित गोसावीयासि उपहारु करावा : गुळा–मिरीयाचिया **आंगारिका** : तांदुळ वेळावेः सरवळेयाची खीरि करावीः......

डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी **'आंगारिका'** शब्दाचा अर्थ 'तेलातील फोडणी' असा दिलेला आहे. तो अनुमानित आणि उघड चुकीचा आहे. 'गुळा–मिरीयाचा' आणि तेलाच्या फोडणीचा' काहीच संबंध दिसत नाही.

हा शब्द गोविंदप्रभूचरित्रात येतो. कणीक मऊ न तिंबल्या गेल्याने (मोवारे ना) पोळ्या निबर कठिण झाल्या. त्या निबर, कठीण पोळ्या पाहून प्रभूंच्या साहजिक विनोद बुद्धीला अंकुर फुटले. पोळ्यांचा उपहास करीत ते म्हणतात.

' आवो मेली जाए : पेंडी खंड : आवो : पीढे पीढे होए म्हणें : '

या ठिकाणी पोळयाचा उपहास 'पीढे' (पाट) म्हणून स्वामींनी केला आहे. या लीळेची आदि 'कठिण **आंगारिका** पीढे उपहासु' अशी आहे. अर्थात् 'अंगारिका' म्हणजे 'पोळी,' तेलाची फोडणी नव्हे.

(संदर्भ लीपू १४२. गोप्रच १४७)

■ ■

## ५. आंबुखा

श्री चक्रधर स्वामींचे वास्तव्य भडेगाव (ता. पाचोरा, जि. जळगाव) येथे होते. स्वामी 'वसइ' (जैनमंदिर) हृया ठिकाणी वास्तव्यासाठी गेले. इंद्रभट स्वामींच्या दर्शनासाठी आले. स्वामी त्याला म्हणतात, 'इंद्रेया ब्राह्मणासि वसैए आतु रिगो नैए : तुम्ही रिगालेति कैसे :' ह्यावर इंद्रभटांनी आपण स्वामींच्या दर्शनासाठी 'वसै' मध्ये आल्याचे सांगितले. यावर स्वामी म्हणतात

> 'हाती वेंझ देवो ए तरी वसै आतु रिगो नैए : हां गा : दश अवतारामध्ये हे एकि देवता कीं ................ भटाचार्यें आपुले शास्त्राचेनि बळे देवते **आंबुखा** घातला : वैरीयाचा देवो जाला तरि कां दगडे फोडावा :

येथे **'आंबुखा'** हा शद्ब आला आहे. यावरील टीपेत 'वसै' शद्बाचा अर्थ डॉ. शं गो. तुळपुळे हृयांनी 'बुद्धमंदीर' असा दिला आहे तो उघडपणे चुकीचा आहे. 'आंबुखा' हृया शद्बाचाही 'पाण्याचा शितोडा वा डुबका' (येथे दोषारोप) असा अर्थ ते देतात. तो अनुमानित आहे हे सांगणे नकोच.

ज्ञानेश्वरीत हा शद्ब दोन वेळा येतो. सोळाव्या अध्यायात आसुरी संपत्तीचे वर्णन करणाऱ्या

> दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोध : पारुष्यमेव च
> अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ भगवद्गीता
> ॥ १६ : ४ ॥

हृया प्रख्यात श्लोकावरील भाष्यात आसुरी संपत्तीचे वर्णन करतांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

> जेया मोक्षमार्गाकडे । यावेया आंबुखा पडे
> न निगे म्हणौनि बुडे । संवसारि जो ॥ ज्ञानेश्वरी १६. २५९ ॥

अर्थात् हा आसुरी संपत्तीयुक्त जीव मोक्ष मार्गाकडे निघण्याचा थोडाही कल होताच ' मी नाही त्या मार्गाला जाणार ' म्हणून पुन्हा संसारसागरात बुडी देऊन बसतो. या ठिकाणी मोक्षमार्ग आणि संसारसागर ह्यांच्या विरोधाचे रूप दाखविण्यासाठी ' आंबुखा ' ह्या शद्वाचा प्रयोग आहे. ज्ञानेश्वरीच्या १७ व्या अध्यायात तामसभोजनाचे वर्णन करणाऱ्या

> यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत्
> उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ।। श्रीमद्‌भगवद्‌गीता
> १७–१० ।।

ह्या श्लोकावरील भाष्य लिहीताना

> मग चमत्कारू देखा । निषेधाचा आंबुखा
> जया की सदोखा । कुद्रव्यासि ।। ज्ञानेश्वरी १६–१६१ ।।

ही ओवी आलेली आहे. इथे ' निषेधाचा आंबुखा ' या शद्वप्रयोगाने आंबुखा ह्या शद्वाचा निषेधाशी संबंध दाखविला आहे. तेव्हा आंबुखा ह्या शद्वाचा अर्थ पाण्याचा शिंतोडा एवढे म्हटल्याने होणार नाही.

(संदर्भ लिपू १८५)

■ ■

## ६. उभेमार्गि

स्वामींचे वास्तव्य बीड येथे माहालक्ष्मीच्या मंदिरात होते. 'सूकीये जोगनायक' त्यांच्या दर्शनासाठी आले. सूकीये जोगनायक संसारतापाने पोळलेले होते. स्वामींच्या दर्शनाने त्यांना सांसारिक दुःखाचा विसर पडला. स्वतःची कर्मकहाणी स्वामींना सांगताना ते म्हणतात

> ' जी : जी: मी मिरजेकडील : उभेमार्गिचा
> सूकीया : तेलंग देशासि गेलो : ...............'

डॉ. तुळपुळे ह्यांनी शद्वकोशात 'उभेमार्गिचा' ह्या शद्वाचा अर्थ दिला नाही. 'सूकीया ' ह्या शद्वाचा अर्थ ते ' शुष्क, क्लेशभूत, लाभ न झालेला ' असा देतात तो कशाच्या आधारावर ते समजत नाही. तो अर्थातच अनुमानित असा आहे. उभोमार्गिचा सूकिया या शद्वावरील त्यांची टीप ' प्रपंच आणि परमार्थमार्गावरील अयशस्वी झालेला ' अशी आहे. हे सर्वच अर्थ अनुमानित आणि लीळेतील आशयावरून कल्पिलेले अतएव त्याज्य आहेत.

'उभेमार्गि ' हा शद्व गोविंदप्रभूचरित्रांतही येतो. या लीळेची आदि ' वाणिजार पेठे क्रीडा ' अशी आहे. लीळेतील महत्वाचा भाग असा

'प्रसरामा इसान्ये वडासमीप वनींजारयांची
पेठ : तेथ वनींजर **उभेमार्गि** उतरेति : तीव्हाळे
घालति : तेथ गोसावी बीजे करीति : ..........'

उभेमार्गि हा शद्ब पंढरपूर येथील चौऱ्यांशीचा शिलालेख म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिलालेखात दोन वेळा येतो. [4] तो असा

'**उभेमार्गि** तिगवदेवे द ग १ दे दां १ (स्तंभ ६ ओळ १९)
'**उभेमार्ग** निंवदेवे द ग दे दां १ (स्तंभ २ ओळ १४)

पंढरपूर येथील आणखी एका शिलालेखात 'उभेमार्गि' हा शद्ब येतो. हा शिलालेख 'पंढरपूर येथील विठ्ठलमंदीराच्या महाद्वाराच्या किंवा नामदेव पायरीच्या समोरील चोखामेळयाच्या समाधीच्या मागील बाजूस एका घराच्या भिंतीत घातलेला' असा डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांना उपलब्ध झाला. त्यांनी तो. पंढरपूर येथील विठ्ठल देवाचा शिलालेख' या शीर्षकाने संपादित केला आहे.[5] या शिलालेखात

'देवराय । चक्रवर्ति । श्रीविठ्ठलदेव । रवलदेव । मुर्ति । **उभेमार्गि**
केशवदेवे विठ्ठलसन्निधी केला धर्मु पावे श्रीविठ्ठला ।

असा उभेमार्गि श्रीकेशवदेवाचा उल्लेख आहे. सारांश उभेमार्गि ह्या शद्बाचे हे सर्व उल्लेख यादवकालीन आहेत.

गोविदप्रभूचरित्रातील उल्लेखावरून 'उभेमार्गि' हा शब्द 'वनींजारांच्या' संदर्भात येतो. अर्थात् हा शब्द व्यापारी समूहांच्या संबंधी आहे. 'वनिजारे' हे फिरस्ते व्यापारी प्रसिद्धच आहेत. कानडी शिलालेखांतून व्यापारी समूहांना ( Guilds ) उद्देशून 'नानादेशी' अथवा 'उभय नाना देशी' हे शब्द वारंवार येतात.[6] तसाच हा उभेमार्गि शब्द असून तो फिरस्त्या व्यापाऱ्यांच्या संदर्भातच आला आहे. कांही तेलुगु शिलालेखातून स्वदेशी आणि परदेशी व्यापारी ह्यांची मिळून उभयदेशी वा उभयनानादेशी अशी श्रेणि ( Guild ) होते असे उल्लेख आहेत. ( Hyderabad Archaeological Series. III Glossary पहा. )

सूंकीया म्हणजे कर वसूल करणारा. सूंक हा शब्द कर, व्यापारी मालावरील कर ( = जकात ) ह्या अर्थाने यादवसम्राट् सिंघणदेव द्वितीय ह्याच्या काळातील पाटण येथील शिलालेखात आणि यादव सेनापती खोलेश्वर ह्याच्या आंबे शिलालेखात आला आला आहे.

शुल्क> शुलक> सूलक> सूअक> सूंक असा अपभ्रंशक्रम दिसतो. इथे अनुच्चारित आहे. अर्थात् 'उभेमार्गिचा सूंकीया' म्हणजे व्यापारी श्रेणी-मधील कर गोळा करणारा अधिकारी असा अर्थ निष्पन्न होतो.

( संदर्भ. लीपू ११९. गोच १६० )

■ ■

## ७. कटक

कटक ह्या शब्दाविषयी अर्थचर्चेची एक रंगतदार फेरी डॉ. वि. भि. कोलते[7] आणि प्रा. सु. म. डोळके[8] ह्यांच्यात झडली आहे. कटक हा शब्द लीळाचरित्रात वारंवार येतो. ते सर्व उल्लेख एकत्र करून डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी कटक हे यादवांच्या राजधानीचे नगर होते असा निष्कर्ष काढला होता. हाच निष्कर्ष डॉक्टरमहोदयांपूर्वी ७ वर्षे आम्ही लीळा-चरित्रातील उल्लेखांचा अभ्यास करून काढला होता.[9] असो. लीळाचरित्रा-तील काही उल्लेख वाचकांच्या सोयीसाठी म्हणून देत आहे.

– लखुदेवोबा गोदाना **कटका** गेले. – ( एकांक लीळा २५ )
– सारंगपंडित **कटका** गेले. – (पूर्वार्धलीळा ९)
– **कटकी** महादेव रायाचे श्राद्ध. ( तत्रैव लीळा २३४ )

या सर्व उल्लेखांवरून 'कटक' हा देवगिरीच्या यादवसम्राटांच्या राजधानीचा उल्लेख आहे हे सहजच लक्षात येते. कारण देवगिरी हा दुर्लंघ्य डोंगरी दुर्गराज आहे. या दुर्गावर वसति करून राहणे अतिशय अशक्य गोष्ट आहे. देवगिरी दुर्गाच्या पायथ्याशी असलेल्या यादवांच्या विशाल नगरीचे नाव कटक असेच होते. पण डॉ. सु. म. डोळके ह्यांचे प्रतिपादन मात्र जरा वेगळ्या स्वरूपाचे आहे. कटक ह्या शब्दाचा उल्लेख नरींद्र कवीच्या रुक्मिणी स्वैंवर ह्या प्रख्यात काव्यग्रंथात आलेला आहे. तो असा

तेथ मुखाचा आंकणा चंद्रु : त्यागे जिंकिला क्षीरसमुद्रु
ते **कटक** वानीताये कवी नरींद्रु : यादवरायाचे ॥

या ओवीतील 'कटक' ह्या शब्दाच्या अर्थाविषयी डॉ. वि. भि. कोलते आणि डॉ. सु. म. डोळके ह्यांच्यात मतभेद आहेत. डॉ. सु. म. डोळके त्यांच्या प्रदीर्घ विवेचनातून त्यांनी 'कटक' ह्या शब्दाचे 'राजपरिवार, परिवार, सैन्याची छावणी, छावणी विभाग (Cantonment) असे अर्थ काढले आहे. कट् ह्या धातुचे 'वर्षावरणयो:' असे दोन अर्थ अमरकोशात दिले आहेत असे ते म्हणतात. अमरकोशाची निर्णयसागरने सिद्ध केलेली

संपूर्ण प्रत धांडोळूनही डॉ. सु. म. डोळके ह्यांनी दिलेले अर्थ कुठेही सांपडले नाहीत. कट ह्या शब्दाचे तीन वेगळाले अर्थ अमरकोशात आहेत ते **अ** श्रोणिफलक **ब** हत्तीचा गंडस्थलभाग **क** धान्य साठवण्याचे वेळूचे टोपले असे आहेत. यातील एकही अर्थ नगर, राजधानी वा सैन्य ह्या अर्थाच्या जवळपास येणारा नाही. नाही म्हणायला 'कटक' ह्या शब्दाचा एक अर्थ पर्वताच्या उतारावरचा भाग असा अमरकोशात सांपडतो. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात योगदुर्गाचे रूपक श्रीज्ञानेश्वरांनी रचले आहे. या रूपकाचा उलगडा करतांना.

वैराग्य महापावके : जाळुनि विषयांचि **कटके**
आधपलिपि तंवके : इंद्रिये धरिलीं ॥ १२.४६ ॥

या ओवीतील 'कटक' ह्या शब्दाचा अर्थ पर्वताच्या उतारावरील भाग असा जो श्री. म. वा. धोंड ह्यांनी घेतला तो योग्य आणि सुसंगतच आहे. ( ज्ञानेश्वरीतील योगदुर्ग सत्यकथा )

अर्थात आपण अशा निर्णयाला येतो की कटक ह्या शब्दाचे जे वेगवेगळे अर्थ आहेत त्यासाठी त्या शब्दाची मूलगामी चिकित्सा आवश्यक आहे.

कट हा शब्द नगर वा राजधानी ह्या अर्थी अमरकोशात सापडत नाही हे आपण पाहिले. पण प्राचीन शिलाताम्रशासनामधून 'नगर' ह्या अर्थी कट हा शब्द अनेकवार आला आहे. हा शब्द देशी असावा. गाव, गव्हाण. पद्र, पल्ली स्थान ह्यांच्या प्रमाणे हे ग्रामनामातील अंत्यपद असावे. वाकाटकांच्या वाशिम शाखेतील विध्यशक्ती ह्या सम्राटाच्या वाशिम ताम्रपटात नांदेडचे प्राचीन रूप नांदीकड" हे आले आहे. [10] प्राचीन शिलाताम्रशासनातून कऱ्हाडची प्राचीनरूपे करहाकट, करहाकड , करहाकटकम अशी मिळतात. [11] विदर्भातील भोजकट ही या परंपरेत ध्यानात येते. अर्थात मोठे, विशाल नगर हा अर्थ 'कट' ह्या देशी शब्दातून निष्पन्न होतो. चौसरीच्या खेळातही नरद कटावर बसली म्हणजे मोक्याच्या जागी बसली असा शब्द प्रयोग केला जातो. ज्या प्रमाणे ग्रामनामाची प्रत्ययेच ग्रामनाम म्हणून वापरण्यात येतात उदाहरणार्थ पल्ली, पाली, हळळी, तळबीड, खेड, फलठाण ही गावांची नावे पहा. खेड, पली हल्ली, बीड पद्र (फल), स्थान (ठाण) हे प्रत्ययच ग्रामनामाचे रूप घेऊन आले आहेत. तेव्हा कट ह्या नावाचे गाव असणे अशक्य नाही. मराठवाड्यातच सांपडलेल्या एका राष्ट्रकूटकालीन ताम्रपटात कट नावाच्या गावाचाच निर्देश आला आहे. हे कटक ह्या ग्रामनामाचे पूर्वरूप दिसते. अर्थात् कट ह्या ग्रामनामवाचक प्रत्ययापासून 'कटक' हे रूप सिद्ध होते. डॉ. सु. म.

डोळके ह्यांच्या संग्रही असलेल्या नरींद्रकवीच्या रुक्मिणीस्वैंवर काव्याच्या एका हस्तलिखित प्रतीत

तेथ मुखाचा आंकणा चंद्र : त्यागे जितिला क्षीरसमुद्र
ते '**कट**' वानिताये कवी नरींद्र : यादवरायाचे

असा 'कट' ह्या जुन्या देशी शद्बाचाच उल्लेख आला आहे. आमचे असे आग्रहाचे प्रतिपादन आहे की 'कट' हाच मूळ पाठ असावा. आणि नगर, राजधानी ह्या अर्थी तोच नरींद्राने वापरला असावा.

आमच्या या विधानास अतिशय बलवान पुरावा असा की 'कट' या ग्रामनामाचाच उल्लेख असलेला एक ताम्रपट मराठवाडा विभागातच सिल्लोड तालुक्यात भिंदोन या ठिकाणी सांपडला आहे. महाराष्ट्रकूट बर्करराज ह्याने दिलेल्या ताम्रपटातील प्रतिग्राही ब्राह्मण भानुभट्ट हा 'कटवास' म्हणजेच कट येथे रहाणारा होता असे म्हटले आहे.[१२] अर्थात् 'कट' हा देशी भाषेतील शद्ब 'नगर' वा महत्वाची जागा ह्या अर्थाचा आहे. त्यापासून 'कटक' 'कडक' 'कटग' ही रूपे सिद्ध होतात. नरींद्राने रुक्मिणी स्वैंवरात 'कट' हा जुना देशी शद्बच उपयोजिला आहे.

'कटक' ह्या शद्बाचा अर्थ 'सैन्य' असाही होतो हे आम्हास मान्य आहे. त्या अर्थाने तो अनेक प्राचीन आणि अर्वाचीन कवींनी वापरलाही आहे. पण आमचे असे प्रतिपादन आहे की 'कटक' हा जो शद्ब सैन्य ह्या अर्थी येतो त्याची व्युत्पत्ति वेगळ्या प्रकारे शोधली पाहिजे. वाजंत्री वाजणे आणि थंडी 'वाजणे' ह्या दोन्ही ठिकाणी 'वाजणे' ह्या धातुची व्युत्पत्ति वेगळ्या प्रकारची असावी. पहिल्या ठिकाणी ती 'वाद्' ह्या धातुपासून तर दुसऱ्या ठिकाणी ती 'बाध्' ह्या धातूपासून शोधावी लागते. तसाच प्रकार 'कटक' शद्बाच्या बाबतीत असावा. 'कट्' हा धातु कापणे, काटणे ह्या अर्थाचा आहे. तेव्हा (शत्रूंना) कापणारे, काटणारे ते सैन्य ह्या अर्थी 'कटक' हा शद्ब आला असावा. 'काटिक' खाटिक (=कसायी) हे शद्ब 'कट' धातुपासून सिद्ध झाले असावेत.

डॉ. सु. म. डोळके हे 'कटक' ह्या शद्बाने 'देवगिरी' ह्या राजधानीची 'छावणी' सूचित होते असे म्हणतात तेही बरोबर नाही. कन्नड साहित्यात 'कटक' शद्बाने राजधानी हाच अर्थ सूचित झाला आहे. कल्याणी ही चालुक्यांची आणि नंतर कलचूरींची राजधानी असल्यामुळ कल्याणचेही अपरनाम 'कटक' हेच उपयोजिण्यात आले आहे.[१३] तसेच देवगिरी ह्या राजधानीच्या नगरासच कटक देवगिरी म्हणत असत असे दिसते. कटक हा देवगिरी ह्या

राजधानीच्या नगराचा 'पुण्याच्या हल्लीच्या कँप विभागासारखा' भाग होता हे स्वतंत्रपणे सिद्ध करण्याची आवश्यकता आहे.

(संदर्भ लीए २५, लीपू ९, ८६, २३४, २५१, २५२, २५३, लीचऊ १२१, २३९, २४७, २६१, २८३,)

■ ■

## ८. कातले

श्रीमत्‌भगवद्‌गीतेत कौरव आणि पांडव ह्यांच्या सैन्यांच्या वर्णनात

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ
माधव. पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ।।

असा श्लोक आला आहे. यावर भाष्य करताना श्री ज्ञानेश्वरांनी ज्या ओव्या लिहिल्या आहेत त्यातील

हो कां निजसार विजयाचे । कीं भांडार महातेजाचे
तेथ गरूडाचिये जावळिचे । **कातले** चारी ।। १.१३८ ।।

ह्या ओवीत **'कातले'** हा शद्व आला आहे. 'कातले' ह्या शद्वाच्या अर्थाचे विस्तृत विवेचन कै. ह. ना. नेने ह्यांनी केले आहे. कांतले म्हणजे 'कांतीव' अथवा 'जुंपले' हे अर्थ कसे अस्वीकारार्ह आहेत हे सूक्ष्म विवेचनाने त्यांनी पटवून दिले आहे. भास्करभट्टाच्या शिशुपाल वधातील

तो कैसा दिसताहे **कातळा** : जैसा अमृतरसाचा ओतला
की स्रष्टेनि धडा घातला : रेवांतासि ।। ९९४ ।।
झळाळितेया सूर्यमंडळा : वरि सावळा मेघ ढमढला
तैसा मुरारि मिरवला : **कातलेया** वरि ।। ९९६ ।।

इत्यादि ओव्या उद्‌धृत करून त्यांनी 'कातळा' म्हणजे 'पांढरा' हा अर्थ सिद्ध केला आहे. आणि त्याचा कम्–कान्त–चकचकित ह्या धातूशी संबंध असावा असा प्राचार्य पांढरीपांडे ह्यांचा अभिप्रायही उद्‌धृत केला आहे. तेव्हा कातला–ळा म्हणजे पांढरा हे त्यांचे मत ग्राह्य वाटते. पण याविषयीचा आमचा अभिप्राय देण्याआधी थोडेसे अवांतर विवेचन क्रमप्राप्त आहे.

कै. हरि नारायण नेने ह्यांचा ज्ञानेश्वरीतील कातले ह्या शद्वाचा अर्थ हा निबंध मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या वार्षिक उत्सवात दिनांक २६ जानेवारी

१९४७ ला वाचला गेला. तो युगवाणी मासिकाच्या मार्च १९४७ च्या अंकात प्रसिद्धही झाला. त्यांच्या संशोधन–लेखसंग्रह, भाग पहिला ह्या ग्रंथात (प्रकाशन १ जून १९५७) मध्ये तो समाविष्टही आहे. असे असता डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी 'शिशुपाळ वध' ह्या भास्करभट्ट बोरीकर कवीकृत काव्याच्या संपादनात ओवी क्रमांक १३५ वर टीपा देतांना (पृष्ठ १३७ पहा) कै. ह. ना. नेने ह्यांचे सर्व विवेचन साररूपाने पण जसेच्या तसे उद्धृत केले आहे. आणि त्या थोर संशोधकाचा नामनिर्देशही टाळला आहे. डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी संपादित केलेल्या शिशुपालवधाची पहिली आवृत्ती १९६० आणि दुसरी १९७२ यावर्षी प्रकाशित झाली हे पहाता तर वरील गोष्ट मनाला बोचल्याशिवाय राहत नाही. असो.

कातळा ह्या शद्वाने 'पांढरा' हा अर्थ सूचित होतो हे खरेच. पण यावर एक शंका उद्भवते ती अशी की ज्ञानेश्वरी, शिशुपाळवध, संतोषमुनी कृष्णदास (पंधराव्या शतकाचा शेवट) ह्याच्या रूक्मिणीस्वयंवर काव्यात आणि नरींद्राच्या रुक्मिणी स्वयंवर काव्यात (ओवी क्र. ८९९) कातळे हा शद्व केवळ घोडयांसाठीच येतो. इतरत्र पांढरा रंग दर्शवताना 'कातले–ला' हा शद्व उपयोजिलेला नाही. तेव्हा आमचे असे आग्रहाचे प्रतिपादन आहे की 'कातळे' म्हणजे डॉ. वि.भि. कोलते म्हणतात त्याप्रमाणें 'श्वेत, पांढरे' असा नसून 'कातळे' म्हणजे पांढरा घोडा.

राष्ट्रकूट आणि यादवकाली ( आणि नंतरही ) भारतात घोडयांची आयात अरबस्थान, तुर्कस्थान, अफगाणीस्तान, सिंध, काबूल, कंदाहार ह्या प्रदेशातून केली जात असे. साहजिक भारतीयांनी अश्व आणि अश्वजातीचे शद्वही वरील भाषांमधूनच घेतले. प्रख्यात संशोधक डॉ. प. कृ. गोडे ह्यांनी हेमचंद्र ह्या गुजराथी जैन ग्रंथकाराचा ग्रंथ अभिधानचिंतामणि, कल्याणीचा चालुक्यवंशीय राजा सोमेश्वर तृतीय भूलोकमल्ल (सर्वज्ञभूप) ह्याचा ग्रंथ अभिलषितार्थ चिंतामणि आणि जयदत्त ह्या लेखकांचा ग्रंथ अश्ववैद्यक (काळ १०००–१२०० इ. स.) ह्या ग्रंथातून अश्वजातीची वर्णने एकत्र करून दिली आहेत. ह्यातील कोकाह, सेराह, खुंगाह, वोल्लाह, उराह, वोरूखान इत्यादि अश्वजातीची नावे पाहिली तर ती अरबी वा तुर्की आहेत हे सहज लक्षात येते. ह्यातच 'कत्तल' हे अश्व जातीचे नाव सोमेश्वर ह्या चालुक्य नृपतीने दिले आहे. त्याचे वर्णन

> पूर्ववत्सर्वशुक्लांगस्त्वचा कृष्णा भवेद्यदि
> वर्णनाम्ना स विज्ञेयः **कत्तलोऽयं** तुरंगमः ॥ ८४ ॥

ह्या श्लोकात येते. एका नृपतीने केलेले हे वर्णन आहे.

तेव्हा कत्तल > कातले म्हणजे 'विशिष्ट वर्णनाचा—पण पांढऱ्या रंगाचा घोडा' कातळे म्हणजे 'पांढरा' एव्हढा मर्यादित अर्थ घेऊन भागणार नाही.

■ ■

## ९. कापडवी

श्रीचक्रधरस्वामी मेहकरहून पैठण–त्र्यंबकेश्वरकडे सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने निघाले. ते मार्गात यथाशक्य वास्तव्य करीत जात होते. ह्या संदर्भात एकांकातील ७२ वी लीळा सांगते.

'पेणे पावलेया एकाधा **कापडवीये** आसन होए :'

डॉ. तुळपुळे ह्यांनी **'कापडवी'** ह्या शब्दाचा अर्थ कापडवी नावाच्या विहीरीवर असा दिला आहे. विहीरींना नावे क्वचित असतातही. उदाहरणार्थ शिंदखेडराजा (महाराणी जिजाबाईच्या माहेरचे गाव) येथील एका विहीरीचे नाव 'सजणाबाई' असे आहे. पापूविहीरी, सावळविहीरी, गेऊरवावी, अशी विहीर, वावी, वापी शब्दांनी सिद्ध होणारी ग्रामनामे प्राचीन मराठी कोरीव लेखातून वारंवार आढळतातही. पण इथे तर 'एकाधा कापडवीए' असे शब्द आहेत. अर्थात् 'एकाधा कापडवीए' ह्या शब्द प्रयोगाने 'कापडवी' हे विशेषनाम नसून सामान्यनाम आहे असे सिद्ध होते. जर 'कापडवी' हे एखाद्या विशिष्ट विहीरीचे नाव असते तर गावोगाव 'कापडवी' कशा असत्या. अर्थात् 'कापडवी' हे कुणा एका विहीरीचे नाव नाही. 'कापडी' 'कावडी' (संस्कृत कार्पटिक) म्हणजे यात्रेकरू हे प्रसिद्धच आहेच तेव्हा 'कापडवी' म्हणजे यात्रेकरूच्या तात्पुरत्या वास्तव्याची जागा, धर्मशाळा असा अर्थ सहजच निष्पन्न होतो. आणि प्रस्तुत लीळेच्या संदर्भात तो अगदी योग्य तऱ्हेने लागू होतो मार्गक्रमण करीत असता अशा धर्मशाळांमधून स्वामी क्वचित राहत असत असा म्हाइंभटांचा अभिप्राय आहे (संदर्भ लीए ७२)

■ ■

## १०. कोळपुरुष

श्रीचक्रधरस्वामी श्री गोविंदप्रभूंना भेटण्यासाठी ऋद्धिपुरकडे जात असतांना मेहकर जवळ वीषए नामक गावी (सध्याचे इसवी ता. मेहेकर, जि. बुलढाणा) ह्या ठिकाणी दादोस त्यांना भेटण्यासाठी आले. स्वामींची आणि दादोसाची भेट वीषए गावाबाहेर 'मार्गी दुसरे तळे' होते तेथे झाली. तळयाच्या पाळयावर स्वामी बसले असता दादोसांनी पूजा कशी केली ? लीळा सांगते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२००५
२२८७४
निबंध

तळांची कमळ काढली : गोसावियासि लोहीवां कमळी पुजा केली :
देवी कमळाची पाकळी तोडीली : गोसावीयांचा श्रीकरी दीधली :
'जी : जी : कोळपुरुषु उद्धरूनि दाखवावा : सर्वज्ञे म्हणितले
'एथौनि देवताचक्र निरूपिता देसकाळीचे आचार्य ऐसेया माझारि
सारिति :...........................................................

अर्थात तळयात उतरल्यानंतर रक्तवर्ण कमळांनी दादोसांनी स्वामींची पूजा केली आणि कमळाची पाकळी तोडून स्वामींच्या हाती देत ते म्हणाले 'जी : जी : कोळपुरुषु उद्धरूनि दाखवावा' कोळपुरुष ह्या शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो, तुळपुळे ह्यांनी 'उन्मत्त किंवा अहंमन्य पुरुष असा दिला आहे तो उघडपणे अनुमानितच दिसतो. तो संदर्भाशी जुळतही नाही

विष्णुने हिरण्याक्षाच्या नाशासाठी वराह अवतार घेतला होता हे प्रख्यातच आहे. या आदिवराहास कोल, आदिकोल असेच सर्वत्रसंबोधले जाते यादवसम्राट रामचंद्र ह्याच्या रामटेक येथील शिलालेखात तेथील टेकडी-वरील विशाल वराहमूर्तीस 'आदिकोल' असेच संबोधले आहे[14] अमर-कोशातही

'वराहः सूकरी घृष्टि कोलः पोत्री किरिः किटिः'
दंष्ट्री घ्रोणी स्तब्धरोमा क्रोडी भूक्षर इत्यपि ।। ९९१–९२

या सूत्रात वराह – सूकर म्हणजेच कोल हे स्पष्टपणे सांगितले आहेच. अर्थात् कोलपुरुष म्हणजेच वराहअवतार दादोसांना अभिप्रेत दिसतो. कारण पुढे स्वामी म्हणतात 'एथौनि देवताचक्र निरूपिता देसकाळीचे आचार्य इतुलेया माझारि सारिती........ .. ......' अर्थात् येथे कोणत्या तरी देवतेचे निरूपण अभिप्रेत आहे असे दिसते, ते वराहअवताराचे – कोळ पुरुखाचे – असावे असा तर्क संभवतो (संदर्भ ली पू २८)

■ ■

## ११. कोदे कांडविणे

स्वामींचे वास्तव्य डोमेग्राम ह्या ठिकाणी होते. स्वामी छिन्नस्थळी नामक खडकावर नदीकाठी बसले होते. त्यांच्या काही भक्त स्त्रिया त्यांच्या सभोवती बसून निरूपण ऐकत होत्या. अशा वेळेला सारंगपंडित हे त्यांच्या दर्शनासाठी आले. स्वामींच्या सभोवती बसून निरूपण श्रवण करणाऱ्या स्त्री भक्तांना पाहून सारंगपंडितांच्या मनात विकल्प उद्‌भवला. त्यांच्या मनात आले

कैसींया गुलगुलीया सातसे परवडी वेढाळुनि बैसलिया
असत : अवघिया नेऊनि घालिजति तेलंगदेशीं :

'कांडविजति कोदे : मग आपण असिजे : गोसावीयांचा
संनिधानी ......................................

इथे डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी कांडविणे ह्याचा अर्थ 'खुपसणे, शस्त्राघात करणें' असा दिला आहे तर 'कोदे' ह्या शद्वाचा अर्थ 'काबाडकष्ट' असा दिला आहे. दोन्ही मिळून 'काबाडकष्ट खुपसणे' असा अर्थ निघेल. तो उघडपणे चुकीचा आणि चमत्कारिक आहे. या शद्वसमूहाचा अर्थ करतांना इतके आडवळणात शिरण्याची आवश्यकता नाही. स्वामींभोवती निरूपण ऐकत बसलेल्या (सारंगपंडितांच्या मते) आळशी स्त्रियांना ते 'कोदे' म्हणजे गवताचे बी (एक प्रकारचे धान्य) कांडण्याची शिक्षा मनोमन देत आहेत. इतका सरळ अर्थ ह्या शद्वसमूहाचा आहे. सातपुडा पर्वतमालिकेच्या दक्षिणेस अकोट, मेळघाट, जळगांव (जि. बुलढाणा) या भागातील कोरकू आदिवासी कोदो, कुटकी अशासारखी जंगली धान्ये खातातही. (संदर्भ-लीचऊ ५)

■ ■

## १२. घागरा बांधणे

स्वामींच्या बहुविध परिवारात अनेक स्वभाववैचित्र्ये असलेले शिष्य आणि शिष्यिणी होत्या. बाईसा ह्या त्यातील स्वामींच्या एकनिष्ठ भक्त. बाइसा चांगल्याच तापट स्वभावाच्या होत्या. भक्तांकडून वा दर्शनास येणाऱ्या इतर एकाद्या व्यक्तीकडून काही अपराध घडला की त्यांच्या रागाचा पारा चढे. त्या शिष्यांवर वा अपराधी व्यक्तीवर त्या तोंडसुख घेत. अशा वेळेस लीळाचरित्रात नेहमी 'मग बाइसी घागरा बांधला' असा उल्लेख येतो. याचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे 'नेसलेले वस्त्र वर खोवणें, पदर बांधणे, सज्ज होणे (वाक्प्रचार : शिव्या देणे) ह्या अर्थी देतात. या ठिकाणी वस्त्राचा काय संबंध येतो ते कळत नाही. बाइसा ही महाराष्ट्रीय स्त्री 'घागरा' सारखे उत्तर भारतीय वस्त्र नेसत असेल असेही वाटत नाही. लीळाचरित्रादिक यादवकालीन ग्रंथांमधून स्त्रियांच्या नेसण्याच्या वस्त्रांचे उल्लेख वोलि, साऊला, लुगडे, पातळ, चोळीया, चोळीया तोड असेच येतात. 'घागरा' कुठेही दिसत नाही. यादवकाळातील मराठी भाषेतील शिव्या देण्याची ही पद्धत आहे. हिचा संपूर्ण पाठ

मर मर पोरा : तुझा मढा बांधे **घागरा** : तथा किडीए :
जो मसणावरि जाए बोबातु. (पूर्वार्ध ३५६, उत्तरार्ध १११)

असा असून उपर्युक्त दोन्ही लीळात थोड्या फार वेगळेपणाने आला आहे. विदर्भातील अकोला, बुलढाणा भागातील आणि मराठवाड्यातील परभणी

नांदेड ह्या भागातील ग्रामीण स्त्रिया आजही अशाच अर्थाची शिवी देतांना दिसतात. (संदर्भ लीपू २२०. लीचऊ १११, ११३, १३८, १८१, १९५)

■ ■

## १३. चांगदेव राऊळ

महानुभावपंथाची सर्व उभारणीच त्यांच्या पंचकृष्ण ह्या अवतार संकल्पनेवर आधारित आहे. या पंचकृष्ण अवतार–संकल्पनेचा स्वीकार ही महानुभाव पंथ स्वीकाराची पहिली अट आहे. ह्या पंचकृष्णांचे स्मरण महानुभावीय सूत्रपाठात अगदी प्रारंभीच आहे. ते असे

जैसे द्वापरी श्रीकृष्णचक्रवर्ती
जैसे सैह्याद्री श्रीदत्तात्रेय प्रभु
जैसे द्वारावती **श्रीचांगदेवो** राऊळ
जैसे ऋद्धिपुरी श्रीगुंडम राऊळ
जैसे प्रतिष्ठानी **श्रीचांगदेवो** राऊळ

यातील शेवटच्या अवताराचे नाव 'प्रतिष्ठानीचे चांगदेव' राऊळ असे असल्यामुळे संशोधकांचा किंचित गोंधळ उडालेला दिसतो. 'श्रीचक्रधरचरित्र' या प्रख्यात ग्रंथामध्ये डॉ. वि. भि. कोलते लिहितात.

> 'तथापि मौनदेव, नग्नदेव, दैवन्य, गोमटदेव इत्यादी नावे स्वामींना उद्देशून निरंतर वापरली जात होती असे नाही ... ........
> तेव्हा स्वामींची खरीखुरी नावे दोनच. एक 'चांगदेव' आणि दुसरे 'चक्रधर'. द्वारावतीकार चांगदेव राऊळ आणि स्वामी एकच असल्यामुळे त्यांनाही चांगदेव राऊळ नाव पडणे स्वाभाविकच होते ...... ..... .. ...... ....... ........................ .. ...
> थोडया सूक्ष्म दृष्टीने विचार केला असता असे म्हणता येईल की चक्रधर हे नांव स्वामींच्या शिष्यांच्या तोंडी प्रामुख्याने येते. चांगदेव राऊळ हे नांव अनुसरलेल्या शिष्यांव्यतिरिक्त इतरांच्या तोंडीच फार येते .......... (पृष्ठ २३, २३, २६,)'

डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे हे मत लीळाचरित्राच्या सूक्ष्म अभ्यासावर आधारित आहे हे तर खरेच. पण मग सूत्रपाठ–जो निःशेष महानुभाव पंथाला पवित्रतम आहे – शेवटच्या कृष्णाचे नांव प्रतिष्ठानी श्री चांगदेवो राऊळांचे 'चरणशरण' असे कां सांगतो ? स्वतः डॉ. वि. भि. कोलते ह्या विषयी गोंधळात पडले आहेत, आणि ह्या ठिकाणी 'चक्रधर' हे नांव

अधिक शोभले असते असाही अभिप्राय व्यक्त करण्यास ते चुकलेले नाहीत. (तत्रैव पृष्ठ २६ तळटीप पहा ;

अर्थात् श्री चांगदेवराऊळ आणि श्रीचक्रधर अशा दोन्ही नावांनी श्री चक्रधराचा उल्लेख होत होता हे स्पष्ट दिसते. फलटणचे श्री चांगदेव राऊळ ह्या परमेश्वर अवतारानेच मृत हरिपालदेवाचे शरीर उठवून त्यात प्रवेश केला असे लीळाचरित्र निःसंदिग्धपणें सांगते. हंसराज, पांडे ह्या बाइसांच्या भवतानाही 'आरे हे कवण पुरुखु: ऐसे नेणासि: हे द्वारावतीकार चांगदेवो राऊळ' अशी 'प्रतीति' आली होती. अर्थात 'आपण द्वारावतीकार चांगदेवो राऊळ आहोत' असा स्वतः श्रीचक्रधरांचाही अभिप्राय आहेच, (प्रख्यात महानुभावपंथसंशोधक डॉ. वा. ना. ना. देशपांडे ह्यांनी तर फलटणचे श्री चांगदेव राऊळच गुजराथेत जाऊन पुन्हा महाराष्ट्रात आले. पुरस्वीकार वगैरे कथा हे पुनरागमन लपविण्यासाठीं बनावट रचलेल्या आहेत असे मत प्रस्तुत लेखकाजवळ व्यक्त केले होते. असो.) अर्थात श्रीचांगदेव राऊळ द्वारावतीकार ह्यांनी हरिपालदेवाचे 'पतित' स्वीकारल्यामुळे श्रीचक्रधराना चांगदेव राऊळ म्हटले जात असे हे उघड आहे. पण दोन अवतारा मधील भेद दाखविण्यासाठी 'प्रतिष्ठानीचे चांगदेवो राऊळ' असा त्यांचा वेगळा उल्लेख करण्यात येत असे उघड दिसते.

पण प्रश्न असा आहे की फलटण येथील 'राऊळांचे' नांव तरी मुळात काय होते? हा प्रश्न शिल्लक राहतोच. पुण्याजवळ फलटण नामक नगरात जनकनायक नामक एक कऱ्हाडा ब्राह्मण राहत होता. त्याच्या बायकोचे नांव जनकाइसा. चाकण येथील 'चक्रपाणी' नामक देवतेस नवस केल्यामुळे त्यांना पुत्र झाला म्हणून त्याचे नांव चक्रपाणी ठेवले. 'चांगदेव' नामक दुसऱ्याही देवतेला नवस केल्यामुळेही पुत्र प्राप्ती संभवली म्हणून ह्या पुत्राचे चांगदेव असे अपर नाव ठेवण्यात आले. अर्थात फलटण येथील चांगदेव राऊळांचे दुसरे नांव चक्रपाणि असेही आहे.

प्रख्यात योगी चांगावटेश्वर ह्याचेही चक्रपाणि असे अपरनाम हरिश्चंद्र गड या पर्वतावरील गुंफेतील लेखात आले आहे.[15] अशा तऱ्हेने आपणास ह्या तीन महापुरूषांच्या नावाच्या तीन जोडया प्राप्त होतात त्या अशा.

फलटण (द्वारावती) येथील श्री चांगदेव राऊळ अथवा चक्रपाणि
प्रतिष्ठान येथील श्रीचांगदेवराऊळ अथवा चक्रधर (चक्रपाणि)
हरिश्चंद्रगड येथील चांगा वटेश्वर अथवा चक्रपाणि

अर्थात ह्यात 'चक्र' आणि 'चांग' हे शद्व समान दिसतात. चक्रपाणि नामक देवतेची चार आणि चागदेव नामक देवतेची दोन मंदिरे महाराष्ट्रात त्यावेळी होती असे स्थानपाथीवरून कळते. चांगदेवपुरी (ता. भुसावळ जि. जळगाव), चांगदेव (पैठण), चांगदेव–डोमेग्राम? (हे स्थानपोथीतील उल्लेख पहा स्थानपोथीत पैठण येथील चक्रपाणि आणि चांगदेव अशा देवतांच्या भिन्न उल्लेख असले तरी चांगदेव म्हणजेच चक्रपाणि ही वैष्णव देवता असावी असे मानण्यास जागा आहे. स्वामी डोमेग्राम येथे असता दाइंबाला त्यांनी ' भोजेया येथौनि येथौनि संखतुळसि दीसताति गा : ' असे भविष्यकथन केले. त्याप्रमाणे 'चांगदेवाचा' बडुवा वारला. ती वृत्ति (वतन) भोजेयास मिळाली आणि ते 'संखी उदक तुळसी' घेऊन 'चांगदेवाच्या' पूजेसाठी जाऊ लागले. अर्थात चांगदेव ही वैष्णव देवता आहे. तो विष्णु (चांग=सुंदर), आहे. चक्रपाणिच आहे.

या सर्व विवेचनातून चांगदेव आणि चक्रपाणि अथवा चक्रधर ही एकाच विशेषनामाची पर्याय रूपे आहेत हे सिद्ध होते. ही विष्णुच्या वा कृष्णाच्या रूपाची नावे आहेत. विष्णु त्याच्या रूपसौन्दर्यासाठी प्रख्यात आहेच. म्हणूनच समुद्रमंथनातून उत्पन्न झालेल्या लक्ष्मीने विष्णुच्या स्वरूपाला भुलून त्याला माळ घातली. तेव्हा चंगदेव, चांगदेव, चक्रपाणि, चक्रधर ही विष्णुच्या स्वरूपसौंदर्यावरून ठेवण्यात येणारी नावे होती असे दिसते. यादवकाळातील अनेक शिलाताम्रशासनातून ती सदैव आढळतातही. चांग ह्या शद्बाचा यादव-कालीन चांगला, सुंदर ह्या अर्थी उपयोग हेच दर्शवितो. स्वत: श्रीचक्रधर अनुपमेय सुंदर होते. त्यांच्या सौंदर्याचे अनेक उल्लेख लीळाचरित्रात आहेत. डोडविहीरकर राघवदेवाने त्यांना 'गोमटदेव' म्हणूनच आळविले. चंग ह्याचा 'चारू' (=सुंदर) असा अर्थ हेमचंद्राच्या देशीनाममालेतही मिळतोच.

किट्टेलच्या कोशातही 'चक्क' ह्या शद्बाचे अर्थ तेजस्वी, सुंदर असाच दिलेला आढळतो. चिक्क हा चक्क पासूनच आलेला शद्ब. इथे 'इ' काराचा आगम आहे. जसे गणगौर–गिणगौर. चिक्क, चिक्क, चिक्किगो ह्या शद्बांचे सुंदर ह्या अर्थी उपयोग जवळ जवळ सर्वच द्राविड भाषातून सापडतात,[16] केरळात सुंदर मुलींना 'चिक्किणी' असे आजही (नि:संकोचपणे) म्हणतात. अर्थात् चक्क, चंग, चिक्क शद्बाचे धाकटा, लहान, चिमखडा, सुंदर वर्तुळाकार असे अर्थ आहेत. घरातील धाकटा भाऊ हा प्रथम चुलता होत असल्याने चुलता वा धाकटा भाऊ ह्यासाठी चक्क, चच्च, चाचा, काका [ किराते च या न्यायाने च–क हे परिवर्तनीय आहेत. उदाहरणार्थ (कंदुक–चेंडु)] असे शद्ब वापरले जातात. पंजाबी भाषेत तर घरातील सर्वात लहान मुलाला 'काका' असेच संबोधिले जाते. आमचे असे प्रतिपादन आहे की, चंग, चक्क, चिक्क ह्या

देशी शब्दाचे संस्कृतीकरण (Urbanisation)' चक्र हे आहे. श्रीकृष्णाच्या हातातील चक्राला 'सुदर्शन'च म्हणतात. 'सुदर्शनचक्र' हा अनुवाद शब्द (Polyglottism) तर नसावा ना ?

अर्थात सूत्रपाठात शेवटच्या अवताराचे नाव 'प्रतिष्ठानीचे चांगदेवो राऊळ' असे आले म्हणून गोंधळण्याचे कारण नाही. चंगदेव, चांगदेव, चांगा ही सर्व रूपे 'चंग' वा 'चक्क' ह्या एकाच देशी शब्दापासून आले असून त्यांचे अर्थ तेजस्वी, सुंदर, लहान, चिमखडा असे आहेत. चक्र, चक्रधर, चक्रपाणि ही त्या देशी शब्दाची संस्कृत केलेली (संस्कृतीकरण झालेली) रूपे आहेत. होनाजी बाळा सारखा पेशवाईच्या शेवटच्या काळातील शाहीरही नायिकेच्या रूपाचे वर्णन 'लखलखाट चकचकाट जसे का दुकान बोहऱ्याचे' असे चकचकाटानेच करतो.[17]

■ ■

## १४. चेंदा

स्वामींचे वास्तव्य खडकुली येथे होते. प्रतिदिनी मठाचे राखण करण्यासाठी एकेका शिष्याची वा शिष्यिणीची योजना होत असे. त्या दिवशी 'घरटी राखावयाची पाळी' आऊसांची होती. गावातील व्यापाऱ्यांच्या मुलांनी (चाटेयांचे आंडौर) या भिक्षावृत्तीने राहणाऱ्या लोकांना भिवविण्याचा डाव रचला. त्यांची योजना अशी.

> चाला रे जाऊ : भेडवु : ये रानी असति :
> **चेंदा** खाति : यांचेनि काइ होववैल : ..................

असा मनोरथ करून त मढावर चालून आले. इथे **चेंदा** ह्या शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी शिळेपाके अन्न किंवा त्यांचा काला असा दिला आहे. पण हा अर्थ लीळेतील आशयावरून कृत्रिम बसविलेला आहे हे उघड आहे. पण चेंदा ह्याचा चेंदामेंदा अथवा काला केलेले अन्न असा अर्थ घेणे योग्य नव्हे. लीळाचरित्रातील असंख्य उल्लेखांवरून स्वामींच्या शिष्यपरिवाराची भोजनपद्धती सुस्पष्ट आहे. त्यावरून ते चेंदामेंदा केलेले अन्न वा काला खात होते असे दिसत नाही. शिळेपाके अन्नही (क्वचित प्रसंगीचा अपवाद सोडता) ते खातांना दिसत नाहीत. हा शब्द लीळाचरित्रात अन्यत्रही येतो. (उत्तरार्ध लीळा २२०) तेथे मात्र 'चेंदेवाईक' ह्या शब्दाचा अर्थ 'चमत्कारिक, तऱ्हेवाईक वागणारा इसम' असा देण्यात आला आहे. अर्थात या दोन्ही ठिकाणी डॉ. शं. गो. तुळपुळे चुकले हे स्पष्टच दिसते.

तेव्हा चेंदा म्हणजे काला केलेले अन्न नव्हे. येथे 'चंदा' म्हणजे मागून आणलेले, गोळा करून आणलेले असा मूळ शब्द दिसतो. चंदा हा शब्द वर्गणी ह्या अर्थी आजही उपयोजिला जातोच. रोजच्या नेमून दिलेल्या अन्नधान्याच्या परिमाणासही 'चंदी' (Ration) असे म्हणतात. अर्थात चंदा म्हणजे घरोघरचे मागून आणलेले अन्न, भिक्षा अथवा परिमित अन्नभक्षण. येथे चंदा ह्या शब्दाचे 'चेंदा' हे रूप आले आहे. 'जंत' (किडा) ह्या शब्दाचे जसे जेंत (उत्तरार्ध लीळा ६४) वा छंद शब्दाचे जसे 'छेंद' (पूर्णामियायची लेकरं. लेखक गो. नी. दांडेकर) रूप होते तसेच ह्या ठिकाणी प्रथमाक्षरात 'अ' काराच्या ठिकाणी 'ए' काराचा विकल्प झाला आहे. (संदर्भ लीचऊ ९,३७,२२०)

■ ■

## १५. चाटे

चाटे हा शब्द लीळाचरित्रात आणि गोविंदप्रभुचरित्रात वारंवार येतो. पण त्याचे दोन अगदीच भिन्न अर्थ दृष्टोत्पत्तीस येतात ते असे.

अ) हरिपालदेव रामयात्रेसाठी जात असता त्यांच्यासह 'उगाणा: कोठी चाटे; बडुवु :' असे सेवक देण्यात आले होते. अर्थात 'चाटे' म्हणजे सेवक डॉ. शं. गो. तुळपुळे समजतात त्याप्रमाणें कापडविक्या वा वस्त्र पुरविणारा नव्हे. (एकांक लीळा–७)

ब) स्वामी बल्हेग्राम येथील सत्यादेवीच्या मंदिरात गेले असता 'भितरी चाटे होते' अर्थात चाटे म्हणजे (देवळातील) सेवक. (पूर्वार्ध लीळा–३११)

क) स्वामींनी साधेला आपले अंग घासून धुण्यास सांगितले असता ती म्हणाली 'आमते चाटे बडुवे मर्दना देती' अर्थात चाटा म्हणजे सेवक. (पूर्वार्ध लीळा–१७८)

ड) स्वामींना यादव राज्यात त्रास झाल्यानंतर त्यांनी 'निमीत्ये एके' उत्तरापंथे बीजे केले. विंध्य पर्वताचा घाट चढत असता 'गंगातीरिचे चाटे गुजराथे कापड विकूं गेले होते ते भेटले' अर्थात इथे चाटे म्हणजे कापड विकणारा व्यापारी हा सरळ अर्थ दिसतो. (उत्तरार्ध लीळा– ४८७, ४८८)

प्राचीन शिलाताम्रशासनातून ही 'चाटा' हा शब्द येतो. बुलढाणा जिल्ह्यातील पारडा येथील शिलालेखात 'चाटुए' असा शब्द येतो. त्याचा अर्थ 'गावच्या व्यापाऱ्यांनी' घ्यावा असे वाटते. या लेखाचे संपादक डॉ. वि.

भि. कोलते तो किनगाव जट्टु या गावाशी जोडतात. व जट्टु हे 'चाटु' चे अपभ्रष्ट रुप मानतात.[18] वडोद चाथा (चाटु ?) नामक गाव सिल्लोड (जि. औरंगाबाद) जवळ आहे पण सांप्रत त्यास 'लुच्यांचे वडोद' म्हणतात. या सर्व विवेचनांवरून 'चाटु, चाटा' या शब्दाचे १ सेवक २. कापडाचा व्यापारी असे दोन अर्थ उपलब्ध होतात. प्रथम आपण सेवक ह्या अर्थाचा विचार करू.

'चाट' हा शब्द प्राचीन शिलाताम्रशासनांतून वारंवार येतो. अग्रहार करून दिलेल्या गावात चाट, भट, आणि छात्र ह्यांनी प्रवेश करू नये हे सांगताना अग्रहार गावाची 'अचाटभटप्रावेश्य' अथवा 'अछात्रभटप्रावेश्य' अशी विशेषणे सांगितली जातात. उदाहरणार्थ उत्तर कोंकणातील शिलाहार नृपति अपराजिताच्या भादाणे ताम्रपटातील 'अचाटभटप्रावेश्य' हा शब्द-प्रयोग पहा.[19] ह्या ठिकाणी 'चाट' ह्या शब्दाचा अर्थ पोलिस, राजसेवक वा Irregular Soldier असा केला जातो. अर्थात चाट म्हणजे सेवक. म्हणून श्रीमंत लोकांकडील हरकाम्या सेवकांना 'चाट' म्हणत असावेत. 'जे देहे ते देवे' या न्यायाने देवळातील श्रीमूर्तींसाठीही सेवक 'चाटे' नेमण्यात येऊ लागले असे स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ तुळजापूर येथील श्री भवानी-मातेला श्रीमंत छत्रपतीसारखेच 'पेशवे, दबीर, मंत्री, सुमंत' इत्यादि अष्ट-प्रधान आहेत. त्याचप्रमाणे सत्यादेवीच्या मंदीरातील 'चाटे' दिसतात.

मग ' चाटे ' म्हणजे व्यापारी हा अर्थ कसा निष्पन्न व्हायचा? प्राचीन काळी गावातून लहान दुकाने असत. ही दुकाने कापडाच्या पालात (ह्यांना 'दुस' म्हणत) तर क्वचित छोटयाशा घरात असत. ह्यांना 'चट्टी' म्हणत. आजही हिमालयात बद्रीकेदाराच्या वाटेवर जी लहान लहान 'दुकाने' यात्रेकरूंना आवश्यक वस्तु पुरवितात त्यांना 'चट्टी'असेच म्हणतात. ज्याप्रमाणे 'दुस' ह्या पालवाचक शब्दापासून पाल घालून वस्तु विकणारा तो 'दोसी' (दुसी) म्हणविला जातो (पूर्वार्ध लीळा १९०) त्याप्रमाणे 'चट्टी' शब्दापासून 'चाट, चाटे, चाटु' हे व्यापारी लोकांचे नाव व्युत्पादिता येते. याचेच रूप 'चेट्टि' 'चेट्टियार' असे दक्षिणेत अजून प्रचालित आहे. कालान्तराने ह्याचे संस्कृतीकरण (Ugbanisation) 'श्रेष्ठि' असे होऊन त्यापासून 'सेठ, सेठी, सेठना' ही रूपे बनलेली दिसतात. एरवी अमरकोशात श्रेष्ठ : या शब्दाचा अर्थ 'श्रेयान् श्रेष्ठ : पुष्कल : स्यात् सत्तमश्चाति शोभते' उत्तम सुन्दर पुरुष एव्हढाच दिला आहे. (अमरकोश २१४१)

सारांश चाटा (=सेवक) आणि चाटा (व्यापारी) हे दोन शब्द भिन्नपणे व्युत्पादावे लागतात.

(संदर्भ लीच ए ७. लीचपू १७८, ३११ लीच ऊ ४८७, ४८८)

# १६. जाळी

श्री चक्रधरस्वामी एकाकी अवस्थेत परिभ्रमण करित होते. अचलपुरजवळ झाडी नामकस्थानी ते राहत होते, गावात भिक्षा मागून स्वतःच्या वास्तव्य-स्थानाजवळ रात्रीच्या वसतीसाठी ते परत येत होते. रामदरणा हा यादवरायांचा मांडलिक. तो सैनिकी अभियानासाठी (कटकैं) जात होता. त्याचा सैन्याचा तळ जवळच पडला होता. स्वामी सैन्याच्या ' दुसांच्या तणेयावर' (राहुटयांच्या तणावावरून) पाय देत गेले. रामदरणा स्वत : स्वामीच्या भेटीस आला. लीळेतील पुढील वृत्तान्त असा .

> 'आणि रामदरणेनि मनोर्थु केला : जे : एवेळेची कटकै परते कां : तरि गोसावियात गांवा घेऊन जाइन : तवं कटकै परतावी ऐसीया जाळीया आलीया :'

या ठिकाणी **'जाळीया'** हा शब्द आला आहे. तो उघडपण स्त्रीलिंगी अनेकवचनी आहे. ह्या शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे. पुढीलप्रमाणे देतात. 'जासुदाकरवी टपाल आले. टपाल ह्या शब्दात टप्प्या टप्प्याने येण्याचा जो अर्थ आहे तोच जाळी ह्या शब्दात आहे. जाळी म्हणजे माळिका किंवा माळका. निरोपाच्या 'जाळचा' आल्या म्हणजे निरोप जासुदांच्या मालिकेतून टप्प्या टप्प्याने आला. हा शब्द 'जाली' या स्वरूपात 'ऐतिहासिक शब्दकोश' कार श्री. य. न. केळकरही देतात (भाग १ पृ.४३४)

हा सर्वच अर्थशोध अनुमानित तर आहेच. पण चमत्कारिकही आहे. 'जाळी' ह्या शब्दाचा अर्थ दोरी असा होतो. पण 'माळ' अथवा 'माळिका' कुठे आढळला नाही. जाळी ह्या शद्वाचे माशाचे जाळे, खिडकीतील जाळी (Lattice) असे अर्थ होतात. तेव्हा ह्या शद्वात 'टप्प्या टप्प्याने' येण्याचा अर्थ शोधणे व्यर्थ होय. श्री. य. न. केळकरांच्या 'ऐतिहासिक शद्वकोशातून' जाळी म्हणजे टपाल हा अर्थ कुठेही आढळत नाही.

या साठी ही लीळा पुन्हा लक्ष्यपूर्वक वाचली पाहिजे. 'जाळीया आल्यानंतर 'गोसावियासि आरोगणा : मग लिखीतें वाचली' अशी वाक्ये आहेत. अर्थात् 'जाळीया' आणणाऱ्या सेवकाने तोंडी निरोप सांगितल्यानंतर स्वामींचे भोजनादि झाल्यानंतर 'लिखीते' वाचली आहेत. अर्थात 'लिखीते' घेऊन 'जासूद' आला. पण 'लिखीते' थैलीत असावीत. पत्र पाठविण्यासाठी प्राचीन काळापासून कापडी पिशव्या वापरीत. 'थैली, खलिता, लखोटा' हे शद्व पत्रांच्या थैल्यांना नेहमी लावले जातात. प्राचीन कन्नड साहित्यात 'जालिगे' हा शद्व आला असून तो 'बसवपुराण' ह्या

प्राचीन कन्नड ग्रंथात आला आहे. त्याचा अर्थ किट्टेलने दोरी, जाळीं (Net, Lattice) असा तर दिला आहेच पण बसवपुराणाने हा शद्ब 'पिशवी, थैली, आंत ठेवणे' ह्या अर्थी उपयोजिला आहे. आजही कानडी भाषेत थैलीला 'जाळीगे' म्हणतातच. तेव्हा 'जाळी' म्हणजे थैली, लखोटा वा खलिता' असा अर्थ निष्पन्न होतो.

■ ■

## १७. तारकवडा

स्वामींचे वास्तव्य नेवासे येथे होते. स्वामींसाठी अनेक श्रीमंत भक्तांनी उपहार आणले. स्वामींच्या भक्तांच्या मनात स्वामींसाठी उपहार करावे असे होते. पण त्यांच्या जवळ द्रव्य नसल्यामुळे त्याला 'स्वामींच्या ठायीं' उपहार करता येईना. स्वामींनी त्याला सातरी पसरविण्यास सांगितले. सातरी पसरून संतोष स्वामींच्या आदेशाप्रमाणे 'पैरा गा : पैरा गा :' असे शद्ब उच्चारू लागला. लोकांनी त्याला 'तांदूळ; उडीद : गहू : जोंदळे : तारकवडा : पोफळ' इत्यादि वस्तु दिल्या असाच प्रकार नाथोबा नामक भक्ताच्या विषयीही घडला. स्वामींनी त्याला वाळवंटात सातरा पसरून 'एळीर : मांगळीर' ह्या शद्बाचे उच्चारण करण्यास सांगितले. तो 'अपूर्व शद्ब' ऐकून 'कोन्ही तांदुळ घाली : गहू घाली : उडीद घाली : तार : पोफळ : कवडे ऐसे :'

या दोन्ही ठिकाणी तार आणि कवडा हे शद्ब येतात. लीळाचरित्रात ह्या लीळा एका पाठोपाठ एक अशाच येतात (लीळाचरित्र उत्तरार्ध लीळा २०३–२०४) यातील २०३ व्या लीळेतील 'तार : पोपळ : कवडा' ह्या उल्लेखावरून तार आणि कवडा ह्या दोन्ही भिन्न वस्तु होत्या असे स्पष्टपणे ध्वनित होते. असे असताही डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'तारकवडा' हा एकच शद्ब गृहित धरला आहे. भास्करभट्टाच्या शिशुपाळवध ह्या काव्यातही 'तार' हा वेगळा स्वतंत्र शद्ब ३२९ व्या ओळीत आला आहे. अर्थात् तारकवडा हा एकच शद्ब आहे असे मानणे मुळातच चूक आहे.

डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यानी तारकवडा ह्या शद्बाचा अर्थही 'नाण्याप्रमाणे चालणारा एक प्रकारचा कवडा' असा अतिशय चमत्कारिक दिला आहे. पूर्वी कवड्यांचा उपयोग क्रय–विक्रयासाठी होत असे हे मान्य पण नाण्याप्रमाणे चालणारा कवडा म्हणजे काय? नाणे ते नाणे आणि कवडा तो कवडा. 'नाण्या प्रमाणे चालणारा एक प्रकारचा कवडा' ह्या शद्ब समूहाचा अर्थच उलगडता येत नाही

'तार' ह्या शद्वाचा अर्थ एक क्षुद्र किंमतीचे नाणे असा आहे. त्या अर्थाने तो दक्षिणेकडील अनेक शिला–ताम्रशासनातून येतो 'Economic Conditions in Karnataka' ह्या ग्रंथात डॉ. जी. आर. कुप्पुस्वामी ह्यांनी कर्नाटकतील शिलाताम्रशासनातून येणाऱ्या नाण्यांच्या उल्लेखांच्या आधारे प्राचीन नाण्यांचे कोष्टक दिले आहे ते असे

१ गद्याण = १० पण

१ पण = २० विश

१ विश = ४ हाग

१ हाग = २ वेळे

१ पण = ६४ कणी, काणी

$१\frac{१}{२}$ तार = १ कणी

ह्या ठिकाणी 'तार' म्हणजे सर्वात लहान मूल्याचे नाणे हा अर्थ स्पष्ट दिसतो.
किट्टेलनेही

१ तार = २ कासु अथवा

१ तार = $\frac{१}{२}$ अथवा $\frac{१}{३}$ फनम्

हा अर्थ देऊन तार म्हणजे तांब्याचे लहान नाणेंच सांगितले आहे. भास्करभट्टांच्या शिशुपालवधातील ३२९ व्या ओवीचा अर्थ आता उलगडतो द्वारकेच्या वैभवशाली आणि अतीव स्वस्ताईच्या व्यापारपेठेचे वर्णन करतांना भास्करभट्टांनी

कापूरवानीयांच्या हाटीं : घेईजे पोतामाची पेटी
एकी तारे साठी : तुकेवीन ॥३२९॥

कापूर विकणाऱ्यांच्या ओळीत कापराची पेटी एक 'तार' ला आणि तीही न तोलता मिळत होती असे वर्णन केले आहे सारांश कापूर इतका स्वस्त होता. येथे डॉ वि भि कोलते ह्यांनी तार ह्या शद्वाचा अर्थ 'सोने, रूपे इत्यादि धातूचा तंतू, धागा' असा दिला आहे. क्षुद्र किमतीचे नाणे म्हणून सोन्या रूप्याचा तंतू कसा चालवता येईल ? असे 'तंतू' नाथोबा किंवा संतोष ह्यांच्या 'सुतरी'वर फेकता येतील काय? त्यांची शोधाशोध कशी करणार ?

सारांश 'तार' हे क्षुद्र किंमतीचे तांब्याचे नाणे आहे, त्याचा कवडा वा सोन्या रूप्याच्या तंतूशी संबंध नाही. जुन्या कन्नडी साहित्यातील म्हणीतूनही 'तार' हा शब्द क्षुद्र नाणे ह्या अर्थीच येतो, उदाहरणार्थ

— तारक्क मुरु सेरू उप्पादरू तरूवदक्के गतिवेडवो
( एका 'तारास' तीन शेर मीठ मिळत असले तरी तेही घ्यावयास भाग्य पाहिजे ना ? इतके दारिद्रय ! )

— तारक्कोन्दु सीरेगादरु नायितिक बत्तले
( एका तारास साडी मिळत असली तरी ह्याची बायको नागडीच )

ह्या कानडी म्हणीतूनही तार म्हणजे क्षुद्र किंमतीचे नाणे हाच अर्थ निघतो (संदर्भ लीचऊ २०३, २०४, )

■ ■

## १८. दामनी

अचलपुर येथे रामदरणा नामक सामंताच्या राजभुवनात स्वामींचे वास्तव्य जवळ जवळ १० महिने होते. शेवटी स्वामी तेथून निघाले. रामदरण्याच्या आईने त्यांची पूजा करून 'पाटाऊ: त्रिवडि : दूटि :' इत्यादि वस्त्रे देऊन त्यांना निरोप दिला. स्वामी विमनस्कस्थीतीत बडनेर मार्गाने निघाले. मार्गातच त्यांनी 'दूटी फाडूनि पोतके केली :' आणि ते गोपाळांना म्हणाले 'गोपाळहो : हे दुसी होईल : तुम्ही ग्राहीक होआ' हा घेण्या देण्याचा व्यवहार कशाने करावयाचा असे गोपाळांनी विचारल्यावर स्वामी म्हणाले 'चींचोरीचीया आसु करा : **दामनियाचे** दाम करा :' येथे चिंचोके चौकोनी असल्यामुळे त्यांचा 'आसू' नामक नाणे म्हणून उपयोग करावा असे स्वामी सुचवितात. आसु हे नाणे चौकोनी असावे. नरींद्र कवीने सम्राट् रामचंद्रदेव यादवांच्या राजसभेत "रुक्मिणी सैंवर' गायिले. 'देवाचेया दादुलेपणाचा उबारा : न साहावेचि साता सागरा : भेणे वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती ।।' या ओवीशी नरींद्र येताच सम्राट् रामचंद्रदेव यादव म्हणाला 'या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा : मी जेतुकिया ओवीया तेतुके सोनटके आणि **चौथरीया आसु** ओवाळणी घालीन : ' इथे 'चौथरीया आसु' असा शब्द येतो. यावरूनही आसु हे चौकोनी नाणे असावे असे वाटते. त्यामुळे चिचोक्यांचे 'आसु' करणे अगदी योग्य वाटते.

पण 'दामनी' म्हणजे काय ? डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी ह्या शब्दाचा अर्थ 'तुटका चिंचोका ' असा दिला आहे. तो योग्य वाटत नाही. विदर्भ

मराठवाडा भागात बाभळीच्या शेंगातील बियांना अजूनही 'धामनी, धामोके, दामोके' असे म्हणतात. लिंबांच्या अर्धुकातील गर काढून टाकून त्यांचा तराजूच्या पारड्यांसारखा उपयोग करून आणि धामोक्यांची नाणी करून प्रस्तुत लेखकही लहानपणी खेळला आहे. बाभळीच्या शेंगाच्या ह्या बिया गोलसर असून त्या छोटया गोल नाण्यांसारख्याच दिसतात. यामुळेच ह्या बियांना 'दाम' ह्या नाण्यासारख्या दिसतात म्हणून दामनिके, दामनिया, दामोके, धामोके असे म्हणत असावेत. तेव्हा 'दामनी' म्हणजे फुटका चिचोका नसून बाभळीच्या शेंगातील बिया हा अर्थ निष्पन्न होतो.

■ ■

## १९. नालाकोला

स्वामींचे वास्तव्य पैंठण येथे ढोरेश्वराच्या मंदीरात होते. भूतानंदांची कन्या धानाइसा हिने स्वामींसाठी अमृतफळे 'अपार' करून आणली. ही सर्वच अमृतफळे स्वामींना द्यावी असा तिचा हेतु होता. तिने आईला तसे सांगितले. पण आईच्या मनात मात्र ही इतकी अमृतफळे स्वामी एकटे खाणार नाहीत. अर्थात् उरलेली अमृतफळे शिष्य परिवाराच्या भक्ष्यस्थानी पडतील' असे होते. भूतानंदांच्या आईला स्वामींच्या परिवाराविषयी आस्था नव्हती. साहजिकच ती म्हणाली 'इतुकी काई करिसी : वायाचि नालाकोला करवि: काइसेया खावविसी :' या ठिकाणी स्वामींच्या (भूतानंदाच्या आईच्या मते) फुकट खाणाऱ्या शिष्यपरिवारासाठी 'नालाकोला' असा शब्द आला आहे. या शब्दाचा अर्थ 'सर्वसामान्य माणसे' असा दिला आहे. तो अर्थातच संदर्भा-वरुन अनुमानित आहे. पण नालाकोला या शब्दात 'सर्व सामान्य' आणि 'माणसे' या अर्थांचे अस्तित्व कुठेही जाणवत नाही.

कोल ह्या शब्दाचा अर्थ 'वराह' असा होतो हे आपण मागे पाहिलेच. तेव्हा कोल म्हणजे वराह, अरण्यपशु. नाल, हा शब्द नाहल ह्या देशी प्राकृत शब्दापासून आलेला आहे. प्रख्यात जैन कवी पुष्पदंताच्या 'जसहर चरिउ' ह्या ग्रंथात तो आलेला आहे. त्याचा अर्थ 'अरण्यचांडाल इत्यर्थे देशी' असाच दिलेला आहे. साहजिकच नाहल > नाअल > नाल असा अपभ्रंशक्रम दिसतो. नाल आणि कोल हे दोन्ही शब्द अरण्याशी संबंधित आहेत. तेव्हा नाला कोला ह्या शब्दातून 'अरण्यचांडाल आणि अरण्यपशु' असा अर्थ निष्पन्न होतो. नादसाहचर्यामुळे (नाला कोला) ह्या दोन्ही शब्दांचा जोड शब्द झालेला दिसतो. भुतानंदांच्या आईच्या दृष्टीने रानावनात राहणारा स्वामींचा परिवार हा अरण्यचांडाल (सर्वभक्षी) वा पशुवत आहे.

(संदर्भ लीच ऊ ३१७)

■ ■

## २०. निर्वंडी

हा शद्व लीळाचरित्रात पूर्वार्ध आणि उत्तरार्ध ह्या दोन्ही भागात अदंडीनाथांच्या आख्यायिकेच्या संबंधात आला आहे. अदंडीनाथ नावाचे महापुरुष एळापूर (आधुनिक वेरूळ) येथे आले. तेथील राजाची राणी त्यांची भक्त झाली. राजाचे गुरू कोणी क्षपणिक (जैन मुनी) होते. त्यांच्या सांगण्यावरून राजाने राणीला अदंडीनाथांच्या दर्शनास जाण्याची बंदी घातली. राणीने आपल्या माळिणीकडून अदंडीनाथांना निरोप पाठविला ' म्हणावे आजि राये **निर्वडि** थोर केली असे : ' येथे 'निर्वडि' हा शब्द आला आहे.

लीळाचरित्र उत्तरार्धातही हीच आख्यायिका थोड्याफार वेगळेपणाने आली आहे. राजाने राणीला अदंडीनाथाच्या दर्शनास जाण्याची बंदी केल्यानंतर ' मग राये सूचना केली : दारवठेयापासौनि दोही सुरकौनि पाइक घातले : जेया वरपडि होइल तेणेंचि उपद्रवावी ऐसा निरोपु दीधला : ' असे वर्णन अधिक आले आहे. प्रख्यात सारस्वत श्री. अ. का. प्रियोळकर ह्यांनी संपादिलेल्या 'श्रीकृष्ण चरित्रात'ही निर्वंडी हा शद्व आला आहे.

लीळाचरित्राच्या पूर्वार्धाचे संपादन करताना डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'निर्वंडी' ह्या शद्वाचा अर्थ निग्रह–निश्चय असा दिलेला आहे. तो संदर्भाशी न जुळणारा असा आहे हे स्पष्टच दिसते. राजाने मार्गाच्या दोन्ही बाजूंनी सैनिक ठेवून राणी दर्शनास जात असता उपद्रवावी–मारून टाकावी अशी 'सूचना' केली होती. तशा प्रकारचा 'निरोप' त्याने सैनिकांना दिला होता. निरोप देणे म्हणजे काम सांगणे, आज्ञा करणे इत्यादि अर्थ तंनिरोपित ह्या शद्वाची जी विविध रूपे यादवकालीन मराठी कोरीव लेखातून येतात त्यावरून सहजच निष्पन्न होतो. तेव्हा 'निर्वडि' हा शद्व 'नि+रूप' ह्या धातूपासून व्युत्पादावा लागेल. त्याचा अर्थ सूचना करणे, आज्ञा करणे, व्यवस्था करणे असा होईल. मृत्युशय्येवरून शेवटची जी व्यवस्था सांगितली जाते तिला 'निरवानिरव' असेच म्हणतात. अर्थात राजाने जी 'व्यवस्था' केली होती त्याला अनुसरून 'निर्वडि' हा शद्व चपखल बसतो.

भास्कर पंडिताच्या शिशुपाल वधातही 'निर्वडि' हा शद्व येतो, यादवांच्या सैन्याने वसती करण्यासाठी ज्या 'तंबू राहूटया' उभारल्या त्याचे वर्णन करताना

> पांता **निरवडि** : विश्वकर्मेयाचि उभाणी साबडी
> म्हणौनि ते गाडेकार होडी : जीणवति ना ॥ ५६७ ॥

येथेही वसतीसाठी डेरे देणाऱ्यांच्या 'निरवडी ' ची तुलना ब्रह्मदेवाच्या सृष्टी उभारणीशी केली आहे. टीपकाराने ' निरवडि : निगुती ' अशी टीप

दिली आहे. विदर्भ–मराठवाडा भागात आजही एखादी गोष्ट व्यवस्थेशीर पार पडली म्हणजे 'निगुती' हाच शब्द वापरतात (उदाहरणार्थ 'निगुतीने संसार करणे)

खळो व्यासकृत सह्याद्रीवर्णनातही हा शब्द येतो. संतांचा जीवनक्रम आणि वागण्याची रीत सांगताना.

> तीर्थाटनाची वेडी : घालुनि पदा **निर्वडि**
> ब्रह्मचर्ये दारकोंडी : केली उपस्तासि ।। ३४८ ।।

येथेही पायांना तीर्थयात्रेची 'बेडी' आणि उपस्थाला ब्रह्मचर्याची 'दारकोंडी' घालण्याची व्यवस्था सांगितली आहे.

विश्वनाथव्यासविरचित ज्ञानप्रबोधातही रसनादमन कसे करावे हे सांगताना

> ऐसा विषयांचा आवडी : म्हणे मन इंद्रियाकडे वोवांडी
> यालागी प्रेतनांची **निर्वडी**: चांग करी ।। ८०८ ।।

या ओवीतही प्रयत्नांची 'व्यवस्था' असाच अर्थ देतो. टीपकारही 'निर्वडी' म्हणजे 'निगुती' अशीच टीप देतात. तेव्हा 'निर्वडि' म्हणजे व्यवस्था निरवानिरव हा अर्थ निष्पन्न होतो आणि प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. देवीसिंहजी चौहान ह्यांना तो मान्यही आहे.

श्री चक्रधर निरूपित ( ? ) श्रीकृष्णचरित्रातील आख्यायिकांमधूनही हा शब्द अनेक वेळा येतो. (पृष्ठे ५, ७, ४४, ९९ इत्यादि पहा) ह्या ग्रंथाच्या अस्सलपणाविषयी प्रस्तुत लेखकाला नेहमीच शंका वाटत आली आहे. डॉ. देवीसिंहजी चौहान ह्यांनी ह्या ग्रंथातील शब्दसंपत्तीचे चांगले विवेचन केले आहे. त्यात 'निर्वडि' ह्या शब्दाविषयीची त्यांची फोड निरवाट (नि + वट्टा, –वाट ह्या अर्थाने देशीनाममालेतील शब्द ) अशी आहे. अदंडीनाथाला भेटण्यासाठी राणी जात असता राजाने मार्ग बंद केले नव्हते. केवळ मार्गा–वर मारेकरी ठेवले होते. ही राजाने केलेली व्यवस्था होती. 'नाकेबंदी' नव्हती. 'निर्वाट' हा शब्द योग्य वाटत नाही. श्रीकृष्णचरित्रात अर्थाचा फारसा विचार न करता वाक्येच्या वाक्ये एकसारखी सर्वत्र घातलेली दिसतात. तेव्हा श्रीकृष्णचरित्रासारख्या बनावट ग्रंथाची साक्ष निरुपयोगी ठरते.

श्रीगोविंदप्रभूचरित्रातही हा शब्द येतो. श्रीप्रभू खाटकाच्या घरी 'हाडामासि' खेळ करून उपाध्यायांच्या घरी जाण्यास निघाले. हे आपल्या

घरातील रांजण इत्यादि भांडी विटाळतील म्हणून उपाध्याय विचार करतात 'जाओ घरी निरवडि करू : ' येथेही उपाध्यायांचा विचार घरी जाऊन विटाळ होऊ नये अशी 'व्यवस्था' करण्याचाच होता. इथे नाकेबंदी (निर+वट्टा) असा अर्थ सुसंगत ठरणार नाही. 'व्यवस्थाच' उत्तम जुळते.

(संदर्भ. लीचपू. ५६. गोच. ४९)

■ ■

## २१. पविते

स्वामी एकांक अवस्थेत भ्रमण करित असता.

' गावी एका जुआठेयासि बीजे केले: जुआरियाते म्हणीतले ' धुरे एकी पवाडु आति : एइजो जी म्हणौनि ते परते सरले : पवाडु केला : मग गोसावी खेळों लागले : बहुत कवडे जीकीले : लाहान कुरंगे कवडे वेंचिले : **पवीत** दीधले : वेगळे कवडे केले ते श्रीकरी घेऊनि दोंदेसि धरिले : रांधवणहाटा बीजे केले :............... ........

या ठिकाणी पविते शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी ' पवित्रक, यज्ञोपवीत' असा चमत्कारिक दिला आहे. पण त्याविषयी ते स्वतःच साशंक आहेत. ही संपूर्ण लीळा जुगाऱ्यांच्या अड्ड्याविषयीची आहे. इथे पवित्रकाचे वा यज्ञोपवीताचे काय काम? हा अर्थ योग्य नाही हे उघड दिसते.

स्वामी एकाकी अवस्थेत भ्रमण करीत होते. साहजिकच ते अनिकेत, अकिंचन – द्रव्यहीन अवस्थेत होते. पण हरिपालदेवाच्या मृत शरीरात प्रवेश केला असल्यामुळे त्यांनी हरिपालदेवाचे गुणधर्म स्वीकारले. (गोसावी तयांचे गुणधर्म स्वीकरिले : गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळण्ही आण : जोआंचे व्यसन: राणियेचा पढियावो : हरिपाळ नाव :) त्यामुळे द्यूत खेळण्याची अनावर इच्छा त्यांना झाली असल्यास नवल नाही. पण द्यूत खेळण्यासाठी आवश्यक ते पैसे त्यांच्याकडे नव्हते हे निर्विवाद. अर्थात् 'जुआरियांकडून 'द्रव्य घेऊनच त्यांनी खेळाचा प्रारंभ केला असणार. हे पावलेले द्रव्य त्यांनी ' बहुत कवडे ' जिकल्या-नंतर लहान कुरंगे कवडे विकून परत केले. इथे ' पावलेले द्रव्य ' म्हणजेच 'पवित'हा अर्थ सहजच निष्पन्न होतो आणि प्रस्तुत लीळेच्या संदर्भात तो चपखल बसतोही. पावणे ह्या धातूची पवणे, पविजे, पवा (आज्ञार्थी) पवति अशी रूपे लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र, शिशुपालवध, वछाहरण इत्यादि यादवकालीन ग्रंथातून अनेक ठिकाणी भेटतात. श्रीज्ञानेश्वरीतही 'वांछित तंव न पवति' (१६.३३६) ऐसेनि कोडी एकी जन्म जाऊ। परि न पविजे माते (१५.२६४) इत्यादि रूपे आहेतच.

अर्थात् ' पविते ' म्हणजे पावलेले द्रव्य. मिळालेले द्रव्य हा अर्थ उपलब्ध होतो. (संदर्भ लीच ए १३)

## २२. भडखळ

कवीचक्रवर्ती भास्करभट्ट बोरीकर हे महानुभाव पंथाने महाराष्ट्र शारदेला दिलेले अनमोल रत्नच आहे. त्यांच्या शिशुपालवध काव्यात शिशुपालाच्या आणि यादवांच्या सैन्याचे अद्‌भुत युद्ध वर्णन करतांना

तंव आंधारवडाजवळे : **भडकळी** होते राहिले
ते राऊत तिकडौनि वळघले : दंतवक्राचे ॥९७४॥

ही ओवी आली आहे. या ठिकाणी ' भडकळ ' हा शब्द येतो. कवीश्वर भास्करभट्टांच्याच ' उद्धवगीता ' अथवा ' एकादशस्कंध ' ह्या काव्यात 'पुरुषाने विषयावासना त्यागावी ' अशा आशयाचे विवेचन करतांना

देऊनि आंगाचा मेळु : आडाये ब्रह्मविद्येचा कोळु
**भडखळी** राहुनि घे आदळु : वीचारेंसि ॥३६४॥

ही ओवी आली आहे. यातही भडखळ हा शब्द येतो. या दोन्ही ग्रंथांचे संपादक डॉ. वि. भि. कोलते आहेत. पहिल्या ओवीतील ' भडखळ ' ह्या शब्दाचा अर्थ डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी 'दबा धरून बसण्याची जागा' असा दिला आहे तो संदर्भाला धरून बनविलेला असला तरी योग्य वाटतो. पण त्यांनीच उद्धवगीतेतील 'भडखळ' ह्या शब्दाचा अर्थ 'रणभूमि, देवडी' असा दिला आहे. आणि अशा रीतीनें आपणच दिलेल्या पहिल्या अर्थाला त्यांनी बाध आणला आहे. रणभूमी आणि दबा धरून बसण्याची जागा ह्या दोन्हींचा अर्थाथीं काहीही संबंध नाही.

औरंगाबादेत एका दरवाजाला भडकळ म्हणतात. तर अचलपुर येथे एका जुनाट पडक्या (मोगलकालीन) वास्तुचे नाव भडकल आहे. दक्खिनी हिंदी भाषेचा प्रख्यात कवी मुल्ला नुस्रती ह्याच्या गुल्शने इश्क ह्या काव्यात राक्षसीच्या जीभेवरील काट्यांचे वर्णन करतांना

अछे जीब पर खार यूं दाट कर
सनीनां है **भडकल** के जूं पाटपर ॥२८.२२॥

असे वर्णन आले आहे. राक्षसीच्या जीभेवरचे काटे भडकलच्या पाटावरील खिळयांसारखे दिसत होते असा नुस्रतीचा अभिप्राय आहे.

याच नुसतीचे दुसरे महाकाव्य 'अलीनामा' नावाचे आहे. त्यातही बाणांनी जखमी झालेल्या हत्तींचे वर्णन करतांना

> लगे मू पो हात्यां के यों तीर दाट
> दिस्या हो हर यक मुहरा भडकला का पाट ।।४१.७६।।

असे वर्णन आले आहे. प्रख्यात संशोधक डॉ. देविसिंहजी चौहान या दोन्ही 'उर्दू' उल्लेखातून या शब्दाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतात. ते लिहीतात 'दक्खिनी हिंदीत हा शब्द नेहमी वापरला जातो. त्याचा अर्थ मोठा दरवाजा असा होतो. औरंगाबाद शहरातील सुबेदारी विश्रामधामाजवळील मोठ्या वेशीला भडकल दरवाजा असे नाव आहे. विशेषत: किल्ल्याच्या मुख्य द्वाराला हा शब्द लावलेला दिसून येतो.'

डॉ. देविसिंहजींचे हे विवेचन बरेचसे यथातथ्य आहे. पण यावर काही आक्षेप संभवतात ते असे.

१) भडकल हा जर 'किल्ल्याच्या' मुख्य द्वाराला लावण्याचा शब्द आहे तर शिशुपालवधातील 'तंव आंधारवडा जवळे : भडकळी होते राहिले' या ओवीतील 'आंधारवड' हा 'किल्ल्याच्या' मुख्य द्वाराजवळ येईल? दुर्गाच्या मुख्य द्वाराजवळ 'आंधारवड' ही लपण्याची जागा वा भयानक जागा कशी ?

२) औरंगाबाद नगरातील सूभेदारी विश्राम धामाजवळील प्रवेशद्वारास 'भडखल' म्हणत नाहीत. येथील दोन्ही दरवाजे 'रंगीन दरवाजा' आणि 'दिल्ली दरवाजा' ह्या नावाने ओळखले जातात.

३) पण 'भडखळ' म्हणजे 'दरवाजा' असा अर्थ घेतल्यास अचलपुर येथे भडखळ नावाची वास्तुच आहे. दरवाजा नाही. तेथे एका जुनाट मोगलकालीन वास्तुलाच भडखळ असे म्हणतात. या वास्तुचे एकूण स्वरूपच ठेंगणे, भुईसपाट आणि दबा धरून बसण्यास योग्य असेच दिसते.

तेव्हा तर्क असा धावतो की यादवकालीन युद्धतंत्रातील हे एक वैशिष्ठ्य असावे. सैनिकांना दबा धरून बसण्यासाठी अशा वैशिष्ठ्यपूर्ण वास्तु बांधल्या जात असाव्यात. ठेंगण्या, बसक्या, दुरून सहज न दिसणाऱ्या अशा. यांच्या दरवाजांवर मोठाले खिळे असणे मग ओघानेच आले. थोडक्यात सांगायचे म्हणजे ही यादवकाळातील Pill-boxes आहेत.

उद्धवगीतेतील यासंबंधी ओव्यांकडे पाहता हाच अर्थ हाती येतो. श्री दत्तात्रेयांनी जे अनेक गुरू केले त्यात 'गज गुरू' (विषयप्रेमामुळे हत्तीणींच्या

निमित्ताने जाळ्यात अडकणारा गजराज) सांगतांना ३६४ व्या ओवीत हा शब्द आला आहे हे आपण पाहिलेच. यातील सर्वच ओव्यात युद्धसंबंधी सामुग्रीचेच निर्देश आले आहेत, ते असे.

तैसा प्रमदांचा भडखंबा । पुतळींयचेनि मिसे कीजे उभा
परि तोही खोची जीवाचा गाभा । देखतखेओ ॥३६०॥

यावरील डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे सर्वच भाष्य पार ढिसाळ झाले आहे. टीपग्रंथात 'प्रमदा लक्षणे भडखंवा' याचा अर्थ 'भडखळामध्ये सेंदुर लावुनि पुतळी आकारूनि' असा दिला आहे. अर्थात भडखळ म्हणजे सैनिकांची दबा धरून बसण्याची जागा, छोटा दुर्ग Pill-box. ह्या अर्थाच्या संदर्भात ह्यावर सेंदुर लावलेली रणदेवतेची मूर्ती–पुतळी असणे संभवते. हा 'प्रमदांचा भडखंभा' होय. ज्याप्रमाणे युद्धात मारल्या गेलेल्या वीराचे स्मारक त्याचा पुतळा करून त्याला शेंदुर लावून करतात (गावो गावचे विरोबा ह्या संदर्भात आठवतात–ओबडधोबड, सेंदुर लावलेले) तसाच मदनयुद्धात 'कामी' आलेल्या प्रमदेचे स्मारक म्हणजे सेंदुर लावलेली पुतळी. हिचा धाक इतका की आंधारात हिला पाहून–भडखळावरच्या सेंदुर लावलेल्या लाल गुंजाळ मूर्तीला पाहून मनुष्य दचकतो. तर प्रत्यक्ष स्त्रीला पाहताच त्याचे धैर्य पार गळणार हा अर्थ असता डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी अतिशय चमत्कारिक असा अर्थ दिला आहे. पुढच्या ओवीत हे युद्धाचे रूपक पुढे चालविले आहे

ते देखता स्त्रीरूप साचोकारे : कवण विषयवेगु संचरे
कंदर्पाचेनि हातियरे : कवणु के ठाकेना ॥३८१॥

अर्थात मदनाच्या हत्यारासमोर (मदनतलवार. राम जोशी) कुणीच वीर उभा राहू शकत नाही असे ह्या ओवीतून सूचित होते. ह्या संदर्भात

देऊनि आंगाचा मेळु : आडाय ब्रह्मवीद्येचा कोळु
भडखळी राहूनि घे आदळु : विचारेंसि ॥३६४॥

यातील रूपक स्पष्ट होते. स्त्री ही आपल्या अंगसंगाचा संयोग देऊन ब्रह्मविद्येची काठी अडवून धरते. भडखळासारख्या सुरक्षित वास्तूत राहून (हृदयस्थानी राहून) विचारांना परतवून लावते. तेव्हा भडखळ म्हणजे रणभूमी वा दरवाजा हे दोन्ही अर्थ ग्राह्य वाटत नाहीत. औरंगाबाद येथील 'भडकल दरवाजा' ह्या वास्तूचे स्वरूपही Pill box सारखेच आहे. शिवाय भडखळ ह्याचा अर्थ दरवाजा असा घेतला तर भडकळ दरवाजा ह्या शद्वात पुनरुक्तीचा (Tautology) चा दोष संभवतो.

■ ■

## २३. मदळसा

स्वामींचे वास्तव्य अनेक मठामंदीरातून होत असे. त्यामुळे लीळा–चरित्रातून मठामंदिराच्या अनेक भागांचे वर्णन प्रसंगोपात्त येते. 'मदळसा' ही अशीच एक वास्तुविषयक संज्ञा आहे. ह्या शद्बाचे लीळाचरित्रातील उल्लेख असे.

अ) स्वामींचे वास्तव्य सिन्नर येथे होते. यादवसम्राट् महादेवराय हा 'ठाणेंया कटकै' गेला होता. महादेवरायाला स्वामींच्या दर्शनाची उत्कंठा होती. सिन्नर येथे स्वामींचे वास्तव्य असावे असे वाटून त्याने आपला सेवक पाल्हा डांगीया ह्याला स्वामींच्या शोधार्थ पाठविले. तो सिन्नर मधील मंदीरे पहात पहात शेवटी भीलमढ या मंदीरात आला. स्वामी 'सोरठिये जाडीचे प्रावर्ण करूनि : गोसावी **मदळसेसि** उभे असति : '

ब) वाकी येथे स्वामींचे वास्तव्य असता 'गोसावी मठाचिये पटिसाळे विळीचा आसन : तथा **मदळसेसि** उभे असति :'

क) डोमेग्राम येथे स्वामींचे वास्तव्य होते. ' गोसावियासि उदेयाचा पूजावस्वर जालेया नंतरे : गोसावी पटिसाळेवरी रीगता उजवेया हाता मदळसेसि पसिमामुख : डावेनि श्रीकरे **मदळसा** धरूनि उभे असति :'

ड) स्वामींचे वास्तव्य संगमेश्वर येथे संगमेश्वराच्या मंदीरात होते. स्वामींच्या प्रभावामुळे संगमेश्वराच्या लिंगाच्या दर्शनार्थ येणारे लोक आकृष्ट झाले.ते आणलेली पूजा स्वामींनाच अर्पण करू लागले. बिचारा गुरव (राणा) निराश झाला. तो 'साजेयावरि **मदळसा** धरूनि इऊले ऐसे तोंड करूनि पाहातु असे.'

इ) नरींद्राच्या रुक्मिणीस्वैंवरातही धारादामोदराचे वर्णन करतांना

कमळकक्षीचिया गुंठीवा : चहूंकडे मैाहुटीया बहुलीवा
**मदळसा** पुतळीया सभावा : कनक–जांबुचिया ।। ४२२ ।।

ह्या ओवीत धारा–दामोदराच्या मदळसा भागी कनक–जांबुच्या पुतळ्या होत्या असे वर्णन आले आहे.

या सर्व वर्णनांवरून 'मदळसा' हा मठाचा वा मंदीराचा दर्शनी भाग असावा असे वाटते. डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी लीळाचरित्राच्या आणि डॉ.

वि. भि. कोलते ह्यांनी स्थानपोथीच्या आणि रुक्मिणी सैंवराच्या संपादनात दिलेला 'छताचा मध्यभाग' हा अर्थ मात्र अगदीच चुकीचा आहे हे चटकन लक्षात येते. छताचा मध्यभाग धरून उभे कसे राहता येईल ? 'राणा साजेयावरि मदलसा धरूनि उभा होता' यावरून हा मठाच्या वा मंदीराच्या दर्शनी भागाचा—साजेयाचा, छज्जाचा भाग दिसतो. 'सज्जाच्या' (कठड्याच्या) खांबास मदळसा म्हणत असावेत. मेढे, मेढी, मेढ, ह्या शब्दांशी त्याचे नाते दिसते. ते कसेही असो. पण छताचा मध्यभाग हा मदळसा ह्या शब्दाचा अर्थ होऊ शकत नाही हे निश्चित.

मंदीराच्या दर्शनी भागाला साजैं (सज्जा) म्हणत. ह्या सज्जाचे लाकडी वा दगडी कठडे असत. त्यांना बाळाणे म्हणत. मदळसा म्हणजे ह्या लाकडी वा दगडी कठड्यांचा लाकडी वा दगडी खांब असावा.

(संदर्भ लीचपू १०, १५३, लीच ऊ १५२, २४७)

■ ■

## २४. मोगरसूल

गोविंदप्रभूंच्या स्वभाव आणि प्रवृत्ती लोकविक्षिप्त वाटत. पण त्यातही सर्वसामान्य जनांचे भले करण्याची त्यांची सहजप्रवृत्ती असे. एकदा ते आबाइसांना म्हणाले. 'आवो मेली जाए **मोगरसूल** वोऊसावे:' मोगरसूल म्हणजे काय हे गंगातीरच्या म्हाइंभटास कळेना. त्यावर आबाइसांनी त्यांना हा प्रकार समजाऊन सांगितला. हा कुंभाराचा आवा लुटण्याचा प्रकार आहे. प्रस्तुत लेखकाने हा प्रकार त्याच्या बाळपणी वऱ्हाडात प्रत्यक्ष पाहिला आहे कुंभारास वस्त्रे, प्रावर्णे, इत्यादि देऊन त्याचा आवा सामान्यजनांकडून लुटविला जातो.

मोगरसूल ह्या शब्दाचा अर्थ डॉ. वि. भि. कोलते ह्यांनी कोणत्याही पदार्थाचा ढीग लोकांकडून लुटविणे' असा दिला आहे. तो योग्यच आहे. भास्करभट्ट बोरीकरांच्या उद्धवगीता अथवा एकादशस्कंध ह्या काव्यात उद्धवदेव श्रीकृष्ण चक्रवर्तीना प्रश्न विचारतात.

तुं पुरता **प्रभावे** : तुज नाही आपुले परावे<br>
तरि मुगतीचे **मोगरसूल** देवे : कां न किजे ।। ६१९ ।।

याच कवीच्या शिशुपालवध ह्या काव्यातही

कैसी धूर बीयाळ : हातसूटि निन्हा नवल<br>
ब्रह्मसुखाचे मोगरसूल : जगा केले ।।५८७।।

या ओवीतही मोगरसूल हा शब्द येतो. या शब्दाची व्युत्पत्ति सांगतांना डॉ. देविसिंहजी चौहान लिहितात.

> 'मोगरसूल हा शब्द संस्कृत मोगर + शूल = मुदगर शूळ ह्या शब्दापासून झालेला असावा. मोगऱ्या, काठ्या लाठ्या, भाले इत्यादिच्या साहाय्याने केलेली क्रिया अर्थात् लूट असा अर्थ निष्पन्न होईल. वस्तुत:, मूलत: मोगरसूल करणे म्हणजे लूट करणे असा अर्थ असावा. कालांतरे मोगरसूल हे लुटीशीच सारुप्य पावले.'

ही व्युत्पत्ती वरवर पाहता योग्य वाटते, पण मुद्‌गर आणि शूल ह्यांच्या साह्याने केलेली क्रिया 'लूटच' कशावरून ? मारणे वा भिवविणे कां नाही ? असा आक्षेप संभवतोच.

ह्या शब्दात मोगर आणि सूल हे शब्द आढळतात हे खरे. ह्यातील मोगर हा शब्द इतरत्र सांपडतो काय ते पहावयास हवे. तसा तो सांपडतो ही. शिशुपाळवधातच पांडवांचे चतुरंग सैन्य वर्णन करतांना भास्करभट्ट बोरीकर लिहीतात.

> उठावले असीवार : जैसे काळकूटाचे धुधुक्कार
> तैसे पायांचे मोगर : निगताति ॥९३१॥

येथे 'निगताति' ह्या शब्दासाठी 'पुढां दाटताति' हा पाठभेद आहे. तो तीन प्रतींमध्ये आहे. तो जास्त सरस आहे. मोगर ह्या शब्दाचा अर्थ डॉ. वि. भि. कोलते यांनी 'सैनिक' असा दिला तो उघडच चुकीचा आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीतही हा शब्द येतो. श्रीकृष्णाच्या विश्वरूपाचे वर्णन करतांना त्या विश्वरूपाच्या विशाल मुखात जाणारे भीष्म, द्रोण राजांचे समुदाय इत्यादि पाहून अर्जुन म्हणतो

> जंत्रावरि चि मार । पदातींचे मोगर
> मुखाआंतु भार । हारपति मां ॥११, ३९०॥

या ठिकाणी मोगर ह्या शब्दाचे अर्थ श्री वेलिंगकर ह्यांनी पायदळ (हंसकोश), निवडक लोक (राजवाडे), मुद्‌गर (कुंटे) असे दिले आहेत. ह्यातील पायदळ हा अर्थ उघडच चुकीचा आहे. कारण मग 'पदातींचे मोगर' ह्याचा अर्थ 'पदातींचे पायदळ' असा होऊन पुनरुक्तीचा दोष पदरी येईल. श्री. बा. अ. भिडे संपादित ज्ञानेश्वरीत मात्र मोगर ह्या शब्दाचा अर्थ समुदाय असा दिला आहे आणि तो अगदी योग्य असाच

आहे. तो वरील सर्वच ठिकाणी चपखलपणे बसतोही. पदातींचे मोगर ह्याचा अर्थ पदातींचे समुदाय असाच करणे योग्य होईल. शिशुपाल वधातील ९३१ व्या ओवीतही 'पायाचे मोगर' ह्या जागी 'पदातीचे मोगर' असाच पाठ वा कवीचा अभिप्राय असावा. ९२४ ते ९२७ ह्या ओव्यात पाडव सैन्याचे आगाधत्त्व, ९२७–९२९ ह्या ओव्यात अर्जुन ह्या सेनापतींचे माहात्म्य, ९३० व्या ओवीत हे सैन्य चतुरंग होते हा अभिप्राय ९३१–९३२ ह्या ओव्यात पायदळाचे वर्णन, ९३३–३७ ह्या ओव्यात अश्वदलाचे वर्णन, ९३८–९४३ आणि ९४४–९४६ हा ओव्यात रथाचे वर्णन असा भास्कर भट्टांचा वर्णनक्रम दिसतो. तेव्हा 'पायांचे मोगर' ह्या शब्दाचा अर्थ 'पदातींचे मोगर' पायदळ सैनिकांचा समूह असाच घ्यावयास हवा हे उघडच दिसते.

अर्थात् मोगरसूल म्हणज समुदायांकडून केलेली लूट किंवा समुदायाला दिलेले (मुक्त) दान. 'सूणे' ह्या क्रियापदाचे देणे, घालणे, ठेवणे, टाकणे, असणे असे अर्थ लीळाचरित्रावरून आणि ज्ञानेश्वरीवरून निष्पन्न होतात. अर्थात् समुदायासाठी दिलेले ते मोगरसूल हा अर्थ उत्तम जमतो. त्याचा मुद्गर वा शूल ह्यांच्वा साहाय्याने केलेल्या लुटीशी संबंध नाही. 'मोगरसूल वोऊसणे' ह्याचा अर्थही 'मी समुदायासाठी मुक्तदान देईन' असा राजे लोकांना शोभण्यासारखा वसा असा होईल. आबाइसाही तेच सुचवित आहे.
(संदर्भ गोच १२४)

■ ■

## २५. म्हातारदाम

स्मृतीस्थळात हा शब्द येतो. एकदा देशात दुष्काळ पडला असता महानुभाव भिक्षुकांस भिक्षा मिळेनासी झाली. तेव्हा भटोबास सर्व गुरुकुळाला दंडवत घालून म्हणाले

'मज **म्हांतारदाम** आला असे : तो विनीयोगावा :
आजिलागौनि माझी एकि भीक्षा घेयावी'

अर्थात् भटोबासांनी 'म्हातारदामाचे' द्रव्य उपयोगी आणून दुष्काळापासून भिक्षूंचे संरक्षण केले. म्हातारदाम ह्या शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'म्हातारपणी सरकरकडून मिळणारी रक्कम अर्थात् pension' असा केला आहे. तर डॉ. यू. म. पठाण ह्यांनी 'म्हातारपणासाठी राखून ठेवलेली रक्कम' असा केला आहे. हे दोन्ही अर्थ अनुमानित आणि अर्थाला अनुलक्षून बसविलेले दिसतात.

महत्तर हा शब्द ग्रामप्रमुख ह्या अर्थी आहे. त्याची रूपे म्हात्र, म्हातारा, मेहतर, म्हातू, म्हात्रा, म्हात्रे मेहेत्रे, अशी सर्वत्र सांपडतात. प्राचीन शिलाताम्रशासनांमधून ग्राममहत्तरांचे कितीतरी उल्लेख आढळतात. नागदेवाचार्य हे पुरी येथील वृत्तिमंत (वतनदार) ब्राह्मण होते. तसा महानुभावीय साहित्यात पुरावा आहे.[20] तेव्हा त्यांना पुरी या गावच्या महाजनपणाच्या–महत्तरपदाच्या वृत्तीविषयी जो दाम मिळत असे तो म्हातारदाम असा अर्थ सहजच संभवतो.

■ ■

## २६. राजमठ

गोविंद प्रभूचरित्र, लीळाचरित्र आणि स्थानपोथी ह्यातून ऋद्धिपूर, ह्रीवरळी (आधुनिक जालना) आणि डोमेग्राम येथील राजमठ नामक वास्तुचे उल्लेख येतात. या राजमठ नामक वास्तुविषयी एक विस्तृत आणि अभ्यासपूर्ण लेख डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांनी प्रकाशिला आहे. परंतु रा. चिं. ढेरे हयांची विधाने आधारहीन आहेत. चुकीच्या गृहितकृत्यावर आधारलेली ही विधाने महानुभावपंथ आणि यक्षोपासना यांचा अकारण संबंध जोडणारी आहेत. त्यामुळेच राजमठ हया संज्ञेचा नोट अभ्यास करणें आवश्यक आहे.

राजमठ म्हणजे नृसिंहमंदीर हे श्री. ढेरे यांचे गृहित कृत्य आहे. हे गृहितकृत्यच कसे चुकीच्या पायावर आधारित आहे ते पहा. श्री. ढेरे लिहितात 'राजमठ ही संज्ञा ऋद्धिपुरातील नृसिंहमंदिरापुरतीच मर्यादित नाही. महानुभाव वाङ्मयात कोणतेही नृसिहमंदीर राजमठ म्हणूनच ओळखले जाते. नरसिंह मठालाच राजमठ ही संज्ञा देण्याचा प्रघात आहे.' आपले हे चमत्कारिक विधान सिद्ध करण्यासाठीं त्यांनी डॉ. य. खु. देशपांडे आणि वि. भि. कोलते हयांची साक्ष काढली आहे. आम्ही दोन्ही विद्वानांचे ग्रंथ मुळातून तपासून पाहिले. (ऋद्धिपूर वर्णन, य. खु. देशपांडे. महानुभाव संशोधन खंड १ ला डॉ. वि. भि. कोलते) हया दोन्ही विद्वानांनी राजमठ म्हणजेच नृसिहमंदीर असे विधान करतांना कोणताही आधार दिलेला नाही. तेव्हा अशा आधारहीन विधानांच्या पोकळ काष्टस्तंभावर श्रीनृसिंहविषयक संशोधनाची इमारत श्री. ढेरे हयांनी उभारावी हे त्यांच्या एकूण लेखनाच्या धाटणीला योग्यच आहे. असो.

प्रथमदर्शनीच एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की राजमठ म्हणजे नृसिंहमंदीर असे जर महानुभाव मानत असते तर ज्या ज्या नृसिंहमंदीरात चक्रधरस्वामी अथवा श्रीगोविंदप्रभूंचा निवास घडला, ती सर्वच नृसिंहमंदीरे

राजमठ म्हणून ओळखली जाती. पण प्रत्यक्षात मात्र तसे मुळीच नाही. उभय अवतारांच्या निवासाने पावन झालेली ही नृसिहमंदीरे पहा.

१) देऊळवाडा येथील नृसिह मंदीर
गोसावियासीः **नरसिंहाचें** चौकी आसन : गोप्रच लीळा १०७

२) नांदेड येथील नृसिहमंदीर
**नृसिंही** भांडारेकारासि असक्ती उपनली : लीच ए ३०

३) त्र्यंबक येथील नृसिहमंदीर
**नरसिंहाचे** देऊळी गोसावी वेढे करीत असती. लीच. पू. १०४

इत्यादि अनेकानेक उल्लेख नरसिंहमंदीर म्हणजे राजमठ नव्हे हे सिद्ध करतात. पण कल्पनेच्या दिशाहीन वारूवर स्वार होणारास त्याचे काय होय?

आप्पासाहेब पटवर्धन ह्यांच्या 'ऋग्वेदाचा संदेश' ह्या प्रख्यात पुस्तकात अचाट संशोधन पद्धतीचे विडंबन करणारा एक लेख 'संशोधन शास्त्राचा मासला' म्हणून पृष्ठ २९८–३०३ वर छापला आहे. त्यात डॉ. श्री. व्यं. केतकर ह्यांच्या संशोधन पद्धतीचे विदारक विडंबन आहे. पण आज जर महर्षि जीवित असते तर 'राजमठाचे रहस्य' यासारखे लेख आणि 'चक्रपाणी' सारखे ग्रंथ पाहून आपले विडंबन प्रत्यक्षात उतरलेले पाहण्याचे भाग्य त्यांना लाभते. असो

राजमठ म्हणजे नृसिहमंदीर हे डॉ. ढेरे ह्यांचे अफाट विधान आहे. लीळाचरित्र आणि गोविंदप्रभूचरित्र ह्यात निदान १३–१४ नृसिहमंदीरांचे उल्लेख आहेत. पैठण, हातनूर, सराळे, देऊळवाडा ह्या गावातील नृसिह–मंदीरातून श्री चक्रधरस्वामी वा गोविंदप्रभू राहिले पण ह्या मंदीरांना कोठेही राजमठ म्हटलेले नाही. स्थानपोथीवरून तर ऋद्धिपूर येथील 'राजमठात' नृसिहाची मूर्ती नसून ती उंचमठात होती असाच संभव अधिक दिसतो. '**उंचमढाचिया** पाइरीया अनुक्रमे ......... ... तया दक्षीणें **नरसिंहेसी** खेळु :................' इत्यादि वर्णन पहा. तेव्हा राजमठ म्हणजे नृसिहमंदीर हे डॉ. रा. चि. ढेरे ह्यांचे विक्षिप्त समीकरण मुळीच टिकणारे नाही.

सुदैवाने यादवकालीन शिलालेखात 'राजमठ' हा शब्द आला आहे. हा शिलालेख खानदेश भागातील जळगाव जिल्ह्यातील 'वळसाणें' ह्या गावी गावाबाहेरील एका टेकडीवर असलेल्या 'मंदीरात' द्वारपट्टिकेवर खोदलेला

आहे.[22] ह्या मंदीरनामक वास्तुकडे पहाताच ही प्राचीन धर्मशाळा असावी, पांथस्थांच्या वास्तव्याची जागा असावी हे प्रथमदर्शनीच पटते. द्वारपट्टीकेवरचा शिलालेखही तेच सांगतो. खानदेशात शासन करणाऱ्या एका अज्ञातवंशीय कृष्ण नामक राजाचा ह्या शिलालेखात उल्लेख आहे. त्याच्या राजसभेत महलूकपंडित नामक कवी होता. गणित, धर्मशास्त्र, प्रबोध इत्यादि शास्त्रात पारंगत असलेल्या ह्या महलूक पंडिताने

अकारयद्राजमठं च भग्नं.
निरंतरं ब्रह्म निवासहेतो : ॥

'ब्राह्मणांनी नित्य राहावे ' ह्या हेतूने राजमठाचा जीर्णोद्धार केला असे स्पष्टच वर्णन आले आहे. अर्थात राजमठ म्हणजे ब्राह्मणाची निवासाची जागा. श्रीचक्रधर स्वामी आणि श्रीगोविंदप्रभू हे 'राजमठात' कां राहत होते हे आपणास आता उलगडते. तेव्हा राजमठ म्हणजे नृसिंहमंदीर हा द्राविडी प्राणायाम आता सोडून देणे योग्यच ठरेल.

(संदर्भ ली. च. पू. १०७)

■ ■

## २७. रामहाटु

नरींद्रकवी, साळकवी आणि नृसिंह कवी हे तिघे भाऊ. नृसिंह कवीने नलोपाख्यान केले. सालकवीने रामायण केले. ह्या दोघांनीही आपआपली काव्ये यादवसम्राट रामचंद्रदेव ह्यांच्या समोर गाऊन दाखविली. तेव्हा नरींद्र कवींनी त्यांना 'यैसा द्वारकेचा '**रामहाटु**' वर्णिते तरि तुमचेया पापां पुरश्चरण होते.' असे आव्हान केले. येथे '**रामहाटु**' हा शद्ब आला आहे. ह्या शद्बाचा अर्थ दिलेला कुठेही पाहण्यात आला नाही.

स्थानपोथीत मात्र हा शद्ब मेहेकर येथील स्थानाच्या संबंधात येतो. तो असा. 'गावामध्ये खांबापासि महीकरोखुहरण : पुर्वपसीम हाटवटि : खांबापुर्वे पसिमिली ओळी **रामहाटुः**'

मेहेकर येथील वास्तव्यात स्वामी भैरवाच्या मंदीरात आणि बाणेश्वराच्या मंदीरात मिळून दहा महिने राहिले. येथील लीळा पाहता भैरव, बाणेश्वर, मार्कंडविहिर, ब्राह्मणाचा आवार, खांबपासि महीक रोख निवारण इत्यादि लीळांची स्थाने नीट जुळतात. उरते केवळ 'सामान्यस्त्री भेटी' ही लीळा. एकांकातील क्रमांक ६७ ची. स्वामी 'सामान्य स्त्री हाटातून' चालले असता दोन सामान्यस्त्रियांनी – गणिकांनी – त्यांना आपल्या घरी नेले. ही लीला 'महीकरोखनिवारण' ह्या लीळेनंतर येते.

सामान्यस्त्रीहाट हे स्थान स्थानपोथीत शोधु जावे तर महीकरोव्रनिवारण ह्या स्थानाजवळ **रामहाट** हे स्थान सापडते. तेव्हा सामान्यस्त्रीहाट आणि रामहाट हे शब्द समानार्थी वाटतात. अर्थात् रामहाट म्हणजे कंचनींची वसती असा अर्थ निष्पन्न होतो. मूळ शब्द रामा (सुन्दर स्त्री, रमविणारी ती रामा) ह्या अर्थी असावा. इंदूर ग्वाल्हेरकडे गणिकांना अजूनही 'रामकली' हाच शब्द आहे. कै. वि. द. घाटे ह्यांच्या दिवस असे होते' ह्या सुप्रसिद्ध आत्मचरित्रात्मक ग्रंथात तो आलाही आहे.[२२] रात्री म्हणजेच सुंदर स्त्री हा शब्द नेपाळी भाषेत आजही वापरला जातो. तेव्हा रामहाट म्हणजे वेश्यावाट असे निश्चयाने म्हणता येते.

नरींद्राने तरी रामायण वा नलोपाख्यान गाण्यापेक्षा श्रीकृष्ण चक्रवर्तीच्या द्वारकेतील रामहाट म्हणजे वेश्याहाटाचे वर्णन केले असते तरी ते पापावनाशक ठरले असते असाच टोमणा सालकवी आणि नृसिंहकवी ह्यांना मारला आहे. श्रीकृष्णचक्रवर्तीच्या पुनीत सान्निध्याने वेश्याही तरून पवित्रतम झाल्या असून त्यांच्या 'हाटाचे' वर्णनही पुण्यकारक आहे असा नरींद्राचा भाव दिसतो. 'सुंदरी रमणी रामा' हे अमरकोषाचे वचन सुप्रसिद्धच आहे. तस्मात् रामहाट म्हणजेच शृंगारहाट अथवा सामान्य स्त्रियांची वसती.

(संदर्भ स्मृतीस्थळ. स्मृती क्र. ११३. स्थान पोथी पृ. १३)

■ ■

## २८. राळे मवणे

स्वामींचे वास्तव्य वेरूळ येथे होते. 'मल्हारवसइ' नामक जैन लेण्यात त्यांचा निवास असता माहादाश्रम आणि ब्रम्हसानु ह्यांनी त्यांच्यावर विष-प्रयोग केला. 'बासनागः काळकूटः मेणाः खडिया तथा रगतसिंगीः' अशी चार महाभयानक विषे एकत्र केली आणि अंधारात स्वामींच्या मुखात घातली. स्वामींना ह्या विषाचा अतिशय त्रास झाला. आकांत करणाऱ्या बाइसांना ते म्हणाले 'बाइः भियानाः हे **राळे मवणे** कीं: बाइः खांबी पुजा ते होआविचि असेः'

डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांसी टीपांमध्ये राळे मवणे आणि खांबीपूजा ह्या दोन्ही शद्बांचे अर्थ स्पष्ट केलेले नाहीत. शेवटच्या शद्बसूचीत खांबीपूजा हा शद्बच गाळला आहे तर 'राळे मवणे' या शद्बापुढची जागा कोरीच आहे. असो.

राळे हे एक प्रकारचे धान्य आहे. ते अतिशय हलके असते. क्षुद्र किंमतीचे हे धान्य कुठेही– खडकाळ भूमीवरही उगवते. मवणे म्हणजे

मोजणे. हा शद्ब ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी आला आहे, उदाहरणार्थ
जन्मशतमापे । सुखचि मविजे ।। १३.३३ ।।

इत्यादी ओव्या पहा.

नरींद्राच्या रुक्मिणी सैवरातील ८१८ व्या ओवीतही हा शद्ब येतो.

चंदनलता चंद्रपुष्पी । ऐरावतीया अनंगचापी
तेथ मधुकर फुलांचा मापी । **मविति** मकरंदु ।।८१८।।

ह्या ओवीतही 'मवणे = मोजणे' ह्या अर्थी हा शद्ब आला आहे. पाटण येथील प्रसिद्ध चंगदेवाच्या शिलालेखातील[23] 'येथ जे मविजे ते मढिचेन मापे मविजे' हे वाक्य पहा. यातही मवणे = मोजणे हाच अर्थ आला आहे. तेव्हा राळे मवणे म्हणजे राळे मोजण्यासारखे हलके फुलके ( आणि हलकटही ) काम. स्वामीवर विषप्रयोग करण्यासाठी ब्रह्मसानु ह्या फारसे श्रमावे लागले नाही. हे हलकट काम–की ज्यात फारशा सामर्थ्याची आवश्यकता नव्हती – ते त्याने चटकन् केले–सहजपणे केले–हा भावार्थ.

आता खांबीं पूजा म्हणजे काय? तर खांबी पूजा म्हणजे वध. पूर्वीच्या काळी अनेक क्रूर देवतांना नरबळी देत असत. महानदीच्या उगमाजवळ ( जिल्हा रायपुर. तालुका कुरुद ) बळी देण्यासाठी उपयोगात आणलेल्या खड्गांचा ढीग एका टेकडीवर पडलेला प्रस्तुत लेखकाने स्वतः पाहिला आहे. बळीला मारण्यासाठी एकदा उययोगात आणलेले खड्ग पुन्हा कशाहीसाठी हाती धरीत नाहीत. ते बळी देण्याच्या टेकडीवर टाकून दिले जाते. यादवकाळासारख्या अंधश्रद्धेच्या युगात तर ही पद्धत पुष्कळच प्रचलित असावी. बळी देण्यासाठी बळीपुरुषाला खांबाला बांधत असत. लाल कण्हेरीच्या वा जास्वंदीच्या माळा त्याच्या गळयात घालीत. त्याच्या सर्वांगावर कुंकू वा गुलाल उधळीत. ह्या सर्व क्रूर आणि भीषण विधीचे उपहासात्मक नाव 'खांबी पूजा' असे न पडते तरच नवल. आपल्या मृत्यूची व्यवस्था करण्याचा राजपुरोहित माहादाश्रम आणि ब्रह्मसानु ह्यांचा मानस आहे हे ओळखूनच स्वामी म्हणतात, 'बाई : भिया ना : हे राळे मवणें कीं : बाइ : खांबी पूजा ते होआविचि असे : ' अर्थात् विषप्रयोगासारख्या कुटील पण ज्यात फारशा उठाठेवीची गरज नाही अशा कामानंतर आपणास बळी देण्यासाठी खांबाला बांधतील (आपल्या मृत्यूची योजना घडवून आणतील) हे सुचविण्याचा स्वामींचा अभिप्राय दिसतो. नाही तरी देवगिरी

येथे स्वामींना वधासाठी कीर्त्तिखांबापाशीच नेले होते. (डॉ. वि. भि. कोलते. श्रीचक्रधरचरित्र पृ. ६२१)

(संदर्भ लीचपू क. ६१ लीळाचरित्र उत्तरार्ध भा. २ पृ. १७६)

■ ■

## २९. वाखारी

स्वामी एकाकी अवस्थेत परिभ्रमण करीत असता लोणार नामक प्रख्यात तीर्थस्थानी आले. योगायोगाने यादव सम्राट कृष्णदेव यादव हाही लोणारला आला होता. कृष्णदेव यादव आणि स्वामी ह्यांची भेट तारातीर्थ नामक ठिकाणी झाली. राजाने 'हडुपाते **वाखारी** मागितली : तीया आसूचे पुजा दर्सन केले : ' येथे वाखारी हा शब्द येतो. ह्याचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'द्रव्याची थैली' असा दिला आहे. पण तो संदर्भावरूनच जुळविलेला आणि अनुमानित असा दिसतो. थैली ह्या अर्थाचे 'पिशवी, पिसवी' हे शब्द लीळाचरित्रात वारंवार येतात. कवडे वा तत्सम नाण्यांच्या संग्रहाच्या संदर्भातही पिसवी हा शब्द लीळाचरित्रात आला आहे. उदाहरणार्थ 'सर्वज्ञे म्हणीतले : बाइ हे घेया काळबोटेयाचे कवडे : दोन्ही पिसवीया बाइसांकडे घातलिया : ' इत्यादि उल्लेख (लीळाचरित्र उत्तरार्ध लीळा १०८) पहा. थैली साठी पिशवी हा शब्द असता पुन्हा वाखारी हा शब्द का यावा हे समजत नाही. त्यामुळे 'वाखारी' आणि पिशवी हे दोन भिन्न शब्द असावेत असे वाटते.

वाख या शब्दाचा अर्थ दोरी असा होतो. तागांच्या तंतूंना आजही वाख असे म्हणातात. वाग्दोर (वा बागडोर) या शब्दात दोर ह्या अर्थी वाख– वाग असाच शब्द आहे. तेव्हा दोरीत ओवलेली नाणी असा तर या शब्दाचा अर्थ नसेल ना अशी शंका मनास चाटून जाते. अशा रीतीने चांदीची नाणी दोरीत ओवण्याची प्रथा चीनमध्ये मध्ययुगात प्रचलित होती.

( संदर्भ लीचए ६.३९ )

■ ■

## ३०. वसइ

स्वामींचे वास्तव्य खानदेशातील भडेगाव (जि. जळगाव) येथे होते. तेथील शिवालय हे रचमचेचे स्थान म्हणून स्वामी 'वसइ' मध्ये वास्तव्यासाठी गेले. इंद्रभट त्यांच्या दर्शनासाठी आले असता स्वामींनी त्यांना 'इंद्रेया : ब्राम्हणा **वसैए** आंतु रिगो नैए : तुम्ही रिगालेति कैसे ?' असा प्रश्न केला येथे वसई हा शब्द आला आहे. या शब्दाविषयी विद्वानांची मते पुढीलप्रमाणें आहेत. [24]

अ. प्रख्यात संशोधक कै. हरि नारायण नेने हे इंद्रभटाच्या मुखातील 'दशअवतारामध्ये हे एकि देवता कीं' ह्या उद्गारांचा आधार घेऊन 'बौद्धस्थान' असा अर्थ देतात. कारण भगवान बुद्ध ह्यांना विष्णुचा नववा अवतार मानले जाते. ह्याचाच अधार घेऊन डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'वसै' ह्याचा अर्थ बुद्धाचे किंवा बौद्ध मंदीर असा दिला आहे.

ब. हे दोन्ही अर्थ प्रा. भी. ब. कुळकर्णी ह्यांना मान्य नाहीत. त्यांच्या मते 'शंकराच्या देवळातील नंदीजवळचा भाग' असा त्याचा साधा अर्थ आहे.

क. कै. वा. ना. देशपांडे ह्यांच्या मते 'जैनांच्या एका तीर्थंकराच्या ऋषभ देवाच्या मूर्तीखाली वृषभाचे चिन्ह असते. त्यावरून हा शब्द सरसकट सर्वच जैनमंदीरांना लावण्यात येत असावा. शंकराच्या मंदीरातील नंदी जवळचा भाग असा अर्थ घेतल्यास 'ब्राह्मणासि वसैए आतु रिगो नैए' असा उल्लेख कसा आला असता अशीही शंका डॉ. वा. ना. देशपांडे ह्यांनी उपस्थित केली आहे.

ड. यावर प्रा. भी. ब. कुळकर्णी ह्यांनी 'बसव' ह्या कानडी शब्दा-पासून 'वसई' शब्दाची व्युत्पत्ती सांगितली आहे. बसव (बसवेश्वर, बसवण्णा) ह्या कानडी संताने वीरशैव संप्रदायाची स्थापना केली. त्याच्या मंदीरात लिंगायत चाटे उतरत असत. म्हणून त्या मंदीरास 'वसति' म्हणतात असा त्यांचा अभिप्राय दिसतो.

इ. गं. ना. मोरजे ह्यांनी मात्र वसई म्हणजे जैनमंदीर हा योग्य अर्थ दिला आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेशातील मराठी भाषिक जैन (सैतवाल जातीचे) अद्यापही आपल्या मंदिरास 'वसइ' असेच म्हणतात. प्रस्तुत लेखकाचे बालपण मराठवाडा – विदर्भ सीमेवर रिसोड नामक गावी जैनांच्याच सहवासात व्यतीत झाले. त्यांच्या तोंडून 'वसइ' हाच शब्द (चुकूनही मंदीर नाही) अक्षरशः असंख्य वेळा ऐकला आहे. कर्नाटकातील बसवेश्वरपूर्व कालातील शिलालेखातूनही तो असंख्य वेळा आला आहे. हळेबीड येथील प्रख्यात जैनमंदीर ज्या भागात आहे, त्या भागास आजही वसतीहळ्ळी (वसतीचे–वसईचे खेडे) असेच म्हणतात. अर्थात् फार प्राचीन काळापासून जैन मंदीरास वसति–वसइ असेच म्हणतात. त्याचा बसव शब्दाशी वा नंदीमंडपाशी काही एक संबंध नाही. बसवेश्वरपूर्व काळात जैनधर्म कर्नाटकात अतिशय प्रबल होता. त्या काळातील (शैवमंदिरात रूपांतर होण्यापूर्वीच्या काळातही) जैन मंदीरांना वसतीच म्हणत असत. स्वतः जैन लोक आपल्या मंदीराला वसती म्हणतात. तेथे बसव शब्दाचा संबंध काय ?

तेव्हा 'वसती' म्हणजे जैन मंदीर हे निश्चित. कर्नाटकातील प्रख्यात जैन तीर्थक्षेत्र हुम्मच येथील 'गुड्डद वसती' ह्या जैनमंदीरातील बाहेरील भिंतीवरील शिलालेखात (शक संवत् ८१९–८९७ इ. स.) 'कल्ल **बसदिय** माडिसियदक्के पोंबुळचद' हे शब्द पहा (जैन शिलालेख संग्रह भाग २' लेख क्र. १३२) येथेही जैन मंदीरासाठी 'वसती' हाच शब्द आलेला आहे.

राहता राहिला इंद्रभटाच्या मुखातील 'दशअवतारामध्ये हे एकी देवता कीं' इत्यादि भाग. ते इंद्रभटाचे अज्ञान असावे. इंद्रभट काही फारसा विद्वान नसावा. देवगिरी – कटक येथे महादेवराय यादवाच्या राजभुवनात श्राद्ध होते. स्वामींनी इंद्रभटास कटक – देवगिरी येथे पाठविले. इंद्रभट म्हणाले 'जी : जी : आम्ही मुख्य सुटदेवो : काही शास्त्र नेणो :' यावरून त्याचे अज्ञानच दिसून येते. त्याला जैन तीर्थंकर मूर्ती आणि बुद्धमूर्ती यांच्यातील भेद कळला नसावा. ब्राह्मणांचे जैन मंदीरांविषयीचे अज्ञान सहजच संभवते. कारण ते जैन मंदीरात कधीच जात नसत. 'हस्तीना ताड्यमानो ऽ पि न गच्छेत् जिनमंदीरम्' हे वचन (हस्ती वेंझ देवो आला तरी ब्राह्मणे **वसैए** आतु रिगों नैए ) सुप्रसिद्धच आहे. तेव्हा वसइ म्हणजे जैनमंदीर हाच अर्थ घ्यावयास हवा. (संदर्भ लीचपू १८५, १८९, १९७ )

■ ■

## ३१. वोहणी

चांगदेवमट आणि जानोपाध्ये ह्यांच्या मनात स्वामींच्या दर्शनासाठी पैठण येथे जावे असे होते. त्यानुसार ते प्रवासांची सिद्धता करित होते. धुतलेली पासोडी येईपर्यन्त ते थांबले. रात्री लाहामाइसेला चांगदेवभट म्हणतात '**वोहणी** सिदोरी सुवा : मी गांवा जाईन :' येथे वोहणी हा शब्द आला आहे.

स्वामी गंगापुर येथे असता पद्मनाभिदेव त्यांच्या दर्शनासाठी आले आपण घरून गुप्तपणे पळून कसे आलो हे सांगताना पद्मनाभिदेव म्हणतात 'जी जी : दुर्गासि सोल लाविली : **वोहणिचिये** पाठीवरी पाये देऊनि चढला: मग सोला सोला उतरला जी :' येथेही वोहणी हा शब्द आला आहे. या दोन्ही ठिकाणीं वोहणी शब्दाचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'प्रवासात खांद्यावर वहाण्याची पडशी' असा दिला आहे. पहिल्या लीळेतील संदर्भाला तो जुळेलही पण 'वोहणीचे पाठी' पाय देऊन कसे चढता येईल. तेव्हा वोहणी म्हणजे पडशी हा अर्थ ग्राह्य वाटत नाही. वोवणी असा शब्द भास्करभट्टांच्या शिशुपालवध काव्यात येतो. श्रीकृष्णाच्या मूर्तीचे वर्णन करतांना त्याच्या गळयातील कौस्तुभरत्नाविषयी भास्करभट्ट म्हणतात.

रविमंडळाभवंती : जरि ताराची **वोवणि** दिसती
तरि एकावळी उपमीजती : कौस्तुभाजवळी ।।३९९।।

या ठिकाणी वोवणि शद्बाचा अर्थ माल, वोलि असा दिला आहे. तो योग्य वाटतो. पण वरील दोन्ही लीळात वोहणि शद्बाचा माळ हा अर्थ संभवत नाही.

वोहणि हा घराच्या वास्तुचा काही भाग असावा काय ? तिथे शिदोरी ठेवण्यास चांगदेवभट लाहामाइसेला सांगत आहेत काय ? वोहणिचे पाठीवर (की पाटीवर ?) पाय देऊन पद्मनाभि दुर्गाची भिंत उत्तरला काय ? वोहणि हा शब्द वधू ( = नवरी ) पासून व्युत्पादिता येईल काय ? वोहारी ( = पत्नी. पांडेया : वोहारी कां गा रूसविली ? ली. च. उत्तरार्ध लीळा क्र. २९१ ) ह्या शब्दाशी त्याचे काही नाते असावे काय ? असे प्रश्न संभवतात. ( संदर्भ ली.च.पू. १०, १७२ )

■ ■

## ३२. सिमोरी

स्वामींचे वास्तव्य एळापुर ( वेरूळ ) येथे होते. एक विद्यावंत (श्रीचांगदेवराऊळ द्वारावतीकार ह्यांचे अनुग्रहित ) जोगीवेषाने दर्शनासाठी आले. स्वामींनी त्यांचा यथायोग्य आदरसत्कार केला. आणि त्यांना निरोप दिला. स्वामींचे शिष्य डखले तेल आणण्यासाठी गेले होते. त्यांना हे विद्यावन्त हाटवटीमध्ये 'सवे **सीमोरी** : हाती सूनेयाचे जवट : बोर : गाजर : उळी : कांदे : ऐसे मागता :' दिसले. येथे सीमोरी हा शब्द आला आहे. त्याचा अर्थ डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी 'झाडाची फांदी; काठी; छडी;' असा अतिशय चमत्कारिक दिला आहे. हा शब्द दृष्टांतपाठात येतो एव्हढे तरी भान त्यांनी ठेवावयास हवे होते.

दृष्टान्तपाठात हा शब्द बांदीकरीयाच्या दृष्टांतात येतो. कुणी एका 'मैळा' चोराने 'बांद धरली' (सुन्दर मुलगी पकडली वा पळवून आणली ) पंचनगरे, नवनगरे त्यास ती 'वांद' मागावयास येतात. तो देत नाही. राजासही देत नाही. मग 'भाटे : थोटी : **सीमूरें** : रांधवणें : सामान्यस्त्रीया : कालाळे :' इत्यादि रूपजीवी लोक त्यास मागावयास जातात आणि ह्या 'साजात्यांना' तो बांद देतो. इथे 'सीमुरें हा शब्द आला आहे.

दृष्टान्तपाठाचे संपादन वा विवेचन आतापर्यंत अनेक अभ्यासकांनी केले असल्यामुळे 'भाटे : सीमुरे :' ह्या शब्दाचे अनेक अर्थ त्यांनी सुचविलेले आहेत. उदाहरणार्थ डॉ. शं. गो. तुळपुळे आणि कुमुदिनी घारपुरे ह्यांच्या दृष्टान्तपाठ संपादनात थोटी म्हणजे आडदांड लोक आणि सीमुरे म्हणजे उद्धट लोक असे अर्थ दिले आहेत. ते उघडपणेच चुकीचे आहेत. बांदीकरीयाचा दृष्टांत: नवे दार्ष्टान्तिक' ह्या आपल्या लेखात (युगवाणी जून–जुलै

१९७३) डॉ. द. भी. कुलकर्णी ह्यांनी 'भाटे : थोटी: सीमुरे: ' ह्या संज्ञांचे नवीन विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची 'आमच्या विवेचनावर टीपग्रंथाचा आधार घेऊन आक्षेप घेण्यात अर्थ नाही,' भाटे : थोटी: सीमुरे ह्यातील काही पुरुष ठरले तरी अर्थात फरक पडत नाही' इत्यादि विधाने जरी संशोधनक्षेत्रातील विद्वानांना कर्णकटु वाटली तरी त्यांचे समवकार म्हणजे सीमुरे हे समीकरण मान्य होणे कठीण वाटते. 'समवकार हा दशरूपकातील एक प्रकार. ह्या नाटयप्रकारात पात्रे विपुल असत. देवदानवाचे युद्ध हा विषय. अशा त्रोटक शद्वात त्यानी सीमुरे ह्या शद्वावरील आपले दार्ष्टान्तिक आवरते घेतले आहे. समवकार पासून सिमोरी व सीमुरे' हे शद्व व्युत्पादिणे अवघड आहे हे त्यांनाही जाणवले असावे. असो.

आमच्या मते हा शद्व 'शिवमुरी' असा असावा. मुरी हा मुरळी ह्या अर्थी शद्व दिसतो. मुरळी>मुरई>मुरी असा अपभ्रंशक्रम असावा. खंडोबाच्या–मल्हारीच्या–मैराळाच्या मंदीराचे अनेकानेक उल्लेख लीळाचरित्रात आहेत. या मैराळांना सोडलेल्या मुरळयाही यादवकाळात असणे अस्वाभाविक नाही. (संदर्भ. लीचपू. ५९; दृष्टांतपाठ दृष्टांत क्र. १६)

■ ■

## ३३. सूड

स्वामी जळगांव जिल्ह्यातील भडगाव नामक गावी वास्तव्य करित होते. संध्याकाळच्या वेळी ते सीवाळा (शिवालय) मध्ये गेले. तेथे त्यांचे वास्तव्य तीन दिवस होते. विष्णुदेव तेथे आले. त्यानी स्वामीची पूजा केली. (विष्णुदेवांनी गायिलेले) 'अनंताचे दोनि **सूड** आइकीले : मग तयासि पाठवणी दीधली : एकु दामु देवविला:' यात सूड हा शद्व येतो. डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी ह्या शद्वाचा अर्थ दिला नाही. त्याच्या समोर नुसते प्रश्न चिन्ह ठेवले आहे. असो.

सूड हा यादवकालीन संगीतशास्त्रातील पारिभाषिक शद्व आहे. यादवसम्राट सिंहणदेव यादवाच्या राज्यसभेत शारंगधर हा प्रख्यात संगीतज्ञ होता, हा काश्मीरी पंडीत वृषगण नामक गोत्रात जन्मला. भास्कर–सोढल–शारंगधर अशी त्याचीं वंशावळ आहे. संगीतरत्नाकर हे शारंगधराच्या ग्रंथाचे नांव. संगीतरत्नाकरातील चवथा अध्याय प्रबंधाविषयी आहे. यात प्रबंधाचे भेद सांगताना सूडप्रबंध असा प्रबंधभेद सांगितला आहे. त्यातही पुन्हा सालगसूड प्रबंध (छायालगसूडप्रबंध) म्हणून सूड गायनाचा वेगळा प्रकार दर्शविलेला आहे. अर्थात स्वामींनी भडेगाव येथे ऐकले ते सूडप्रबंध गायन. त्या विषयी त्यांनी विष्णुदेव नामक त्या गवयाला 'एक दाम' अशी बिदागीही दिली आहे.

अर्थात सूड हा प्रबंध गायनाचा प्रकार आहे. (संदर्भ लीचपू. १८१)

## संदर्भ

१) वि. भि. कोलते. महानुभाव तत्त्वज्ञान. पृष्ठ १७६–१७८, २४८

२) ज. शा. देशपांडे. नवे नवनीत. पृष्ठ १७२

३) सोमदेवसूरिकृत यशस्तिलकचंपू. (सं. सुन्दरलाल शास्त्री) पृष्ठ ५०९.

४) शं. गो. तुळपुळे. प्राचीन मराठी कोरीव लेख. पृ. १६५ – १९१

५) तत्रैव. पृष्ठ ८५ – ९३.

६) G. R. Kuppuswamy. Economic Conditions in Carnataka. page 103

७) वि. भि. कोलते. युगवाणी, ऑक्टोबर – नोव्हेंबर १९७७

८) सु. म. डोळके तत्रैव, एप्रिल – मे १९७८.

९) ब्रह्मानंद देशपांडे 'आशय' वार्षिक. १९७१.

१०) Epigraphia Indica. Vol. XXVI p.p. 137 f.

११) संशोधनमुक्तावलि सर ४ था पृष्ठ. ११५

१२) प्रतिष्ठान. मासिक जुलै – ऑगस्ट १९७८ पृ. २७–३२

१३) Kittel's Kannada - English Dictionary. page 354

१४) वा. वि. मिराशी. सरदेसाई स्मारक ग्रंथ पृष्ठ ११५

१५) वि. भि. कोलते. विदर्भ संशोधक मंडळ वार्षिक पृ. ६५–७८

१६) A Dravid Etymological Dictionary.

१७) म. वा. धोंड. मऱ्हाटी लावणी. पृ. १३९ १४०

१८) वि. भि. कोलते. मराठी संशोधन खंड. १ (संपादक अ. का. प्रियोळकर ८९. ९३)

१९) Epigraphia Indica - Vol. III pp 267 f.

२०) सु. का. जोशी. नागदेवाचार्यचरित्र पृ. ३

२१) रा. चिं. ढेरे. महाराष्ट्र साहित्य पत्रिका. ऑक्टोबर १९६१

२२) Epigraphia Indica. Vol. XXVI pp. 309 - 313

२३) वि. द. घाटे दिवस असे होते. पृष्ठ ६८

२४) शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी कोरीव लेख पृ. १०५–११४

२५) मराठी संशोधन पत्रिका. खंड ४.

■ ■

## संदर्भ ग्रंथ

### यादवकालीन साहित्य

श्रीज्ञानेश्वरी

अ) १. महाराष्ट्र शासन प्रत.

ब) २. संपादक बा. अ. भिडे
तिसरी आवृत्ती १९५६.
श्री समर्थसदन प्रकाशन

३) लीळाचरित्र एकांक

४) लीळाचरित्र पूर्वार्ध भाग १

५) लीळाचरित्र पूर्वार्ध भाग २

६) लीळाचरित्र उत्तरार्ध भाग १

७) लीळाचरित्र उत्तरार्ध भाग २
(क्रमांक ३ ते ७ सर्व प्रथम आवृत्ती १९६६–६७
संपादक डॉ. शं. गो. तुळपुळे
सुविचार प्रकाशन नागपूर)

८) श्री गोविंदप्रभू चरित्र
प्रथम आवृत्ती १९६०

९) स्थानपोथी
दुसरी आवृत्ती १९७६

१०) नरींद्रकृत रुक्मिणी स्वयंवर
दुसरी आवृत्ती १९६६

११) भास्करभट्ट कृत शिशुपालवध
दुसरी आवृत्ती १९७२

१२) भास्करभट्ट कृत उद्धवगीता
दुसरी आवृत्ती १९६२

१४) दामोदर पंडितकृत वछाहरण
तिसरी आवृत्ती १९७६

१५) विश्वनाथ व्यासकृत ज्ञानप्रबोध
प्रथम आवृत्ती १९७३
(क्रमांक ३–१५. संपादन डॉ. वि भि. कोलते. अरुण प्रकाशन मलकापूर.)

१६) खळोव्यासकृत सह्याद्रिवर्णन
प्रथम आवृत्ती १९६४
संपादक वि. भि. कोलते
पुणे विद्यापीठ प्रकाशन

१७) दृष्टान्तपाठ
प्रथम आवृत्ती १९७३

१८) स्मृतीस्थळ
प्रथम आवृत्ती १९७४
(क्रमांक १७–१८ संपादक यू. म. पठाण
समर्थ प्रकाशन. औरंगाबाद)

१९) श्रीचक्रधरनिरूपित श्रीकृष्णचरित्र
संपादक अ. का. प्रियोळकर.
खंड ३, ४, ५. १९६६–६७

२०) कृष्णदासकृत रुक्मिणी स्वयंवर

२१) शारंगधरकृत संगीतरत्नाकर
भाषान्तरकार ग. ह. तारळेकर
प्रथम आवृत्ती १९५७
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. मुंबई.

२३) सूत्रपाठ
प्रकाशक माधवराव पंजाबी
अमरावती.

**इतर प्राचीन ग्रंथ**

२३) अमरकोश
नववी आवृत्ती १९५०
संपादक नारायणराम आचार्य काव्यतीर्थ
निर्णयसागर प्रेस, मुंबई.

२४) जसहर चरित्र
संपादक परशुराम लक्ष्मण वैद्य
अंबादास चवरे दिगंबर जैन
ग्रंथमाला कारंजा (वऱ्हाड)

२५) यशस्तिलक चंपू
संपादक सुन्दरलाल शास्त्री
महावीर जैन ग्रंथमाला
वाराणसी, उत्तर प्रदेश

२६) A Dravid Etymological Dictionary
T. Burrow
and
M. B. Emeanau
Oxford University Press.

**आधुनिक शोधग्रंथ**

२७) ऐतिहासिक शब्दकोश
य. न. केळकर
ठोकळ प्रकाशन. बुधवार, पुणे

२८) ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार
द. रा. वेलिंगकर
मराठी संशोधन मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई.

२९) Kittel's Kannada-English Dictionary
Revised edition 1969.
University of Madras.

३०) प्राचीन मराठी कोरीव लेख
शं. गो. तुळपुळे १९६३
पुणे विद्यापीठ प्रकाशन

३१) यादवकालीन मराठी भाषा
दुसरी आवृत्ती १९७३
शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन पुणे

३२) श्रीचक्रधरचरित्र
दुसरी आवृत्ती १९७७

३३) महानुभाव तत्त्वज्ञान
चौथी आवृत्ती १९७५
(क्र. ३२–३३ वि. भि. कोलते.
अरुण प्रकाशन, मलकापुर)

३४) शिलाहार नृपती आणि त्यांचे कोरीव लेख

३५) संशोधन मुक्तावलि सर
(क्रमांक ३४–३५ लेखक वा. वि. मिराशी)

३६) संशोधन लेखसंग्रह भाग पहिला
लेखक हरि नारायण नेने
(क्र. ३४, ३५, ३६ विदर्भ संशोधन मंडळ नागपुर)

३७) मराठी संशोधन खंड ४
संपादक म. वा. धोंड
मुंबई मराठी ग्रथसंग्रहालय

३८) दक्खिनी हिंदी
देविसिंग चौहान
महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे

३९) जैन शिलालेख संग्रह द्वितीय भाग
संपादक विद्याधर जोहरापुरकर
संपादक विजयमूर्ति शास्त्राचार्य
माणिकचंद्र जैन ग्रंथमाला मुंबई.

४०) महानुभावीय मराठी साहित्य
दुसरी आवृत्ती १९६०
य. खु. देशपांडे
व्हीनस प्रकाशन. पुणे

४१) Studies in Indian Literary History
P. K. Gode
Gode Works Publication Committe.
PUNE.

४२) Economic conditions in Karnatka
G. R. Kuppuswamy
Karnataka Universisy Dharwar.

४३) ऋग्वेदाचा संदेश
महर्षि अप्पासाहेब पटवर्धन

४४) नवे नवनीत
दुसरी आवृत्ती
संपादक ज. शा. देशपांडे
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई.

४५) दिवस असे होते
वि. द. घाटे
मौज प्रकाशन मुंबई

४६) पूर्णामायची लेकरं
गो. नी. दांडेकर

४७) मराठी संशोधन खंड–२
संपादक अ. का. प्रियोळकर
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई

४८) होनाजीच्या लावण्या
मराठी लावणी
म. वा. धोंड
मौज प्रकाशन, मुंबई

४९) नागदेवाचार्यचरित्र
सु. का. जोशी
वैभव प्रकाशन, पुणे

५०) महानुभाव संशोधन. खंड १ ला
अरुण प्रकाशन, मलाकापूर


## नियतकालिके


५१) Epigraphia Indica
५२) मराठी संशोधन पत्रिका
५३) मराठी साहित्य पत्रिका
५४) विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक
५५) युगवाणी
५६) प्रतिष्ठान



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0022914